|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० | अंक : ४३ | सोमवार दि. १७ ऑक्टोंबर २०२२ ते रविवार दि. २३ ऑक्टोंबर २०२२ | पाने : ८ | किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## पतीचा खून केला कुणी पत्नीच निघाली खूनी

चांदवड/क्राईम रिपोर्टर

नाशिकच्या कातरवाडी येथील खुनाच्या घटनेची पोलीसांनी उकल करताच धक्कादायक घटना समोर आली आहे. नाशिकच्या कातरवाडी येथे एका तरुण शेतकऱ्यांच्या खुनाची घटना समोर आली होती. ४८ तासांतच नाशिकच्या ग्रामीण पोलीसांनी या घटनेची उकल केली आहे. प्रियकराच्या मदतीने पत्नीने आपल्याच नवऱ्याचा खून केल्याची बाब समोर आली आहे. अनैतिक संबंधांमध्ये पतीची अडचण येत असल्याने पत्नीने आणि तिच्या प्रियकराने मित्राच्या ...पान ६ वर

# निवडणूक जिंकण्यासाठी स्मशानात काळी जादू केली अंधश्रद्धेने पेटवलेल्या चितेवर जळून लोकशाही मेली

वाड/क्राईम रिपोर्टर

**जुनाट रूढी परंपरा आणि त्यातून निर्माण झालेली अंधश्रद्धा, यातून भोळ्या भाबड्या लोकांची लूट केली जाते. समाजाचे आर्थिक आणि महिलांचे लैंगिक शोषण केले जाते. म्हणूनच दाभोळकरांसारख्या समाज सुधारकांनी अंधश्रद्धेच्या विरुद्ध आयुष्यभर लढा दिला. त्यामुळे महाराष्ट्रात जादूटोणा विरोधी कायदा अस्तित्वात आला. पण दुर्दैवाने त्या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याने आजही अनेक ठिकाणी जारण-मारण, जादू-टोना, भूत-प्रेत, आत्मा यांची भीती दाखवून लोकांना लुटले जातेय. लोकांची खुलेआम फसवणूक होतेय आणि फसवणूक करणाऱ्या भोंदूबाबांची दुकाने मात्र तेजीत सुरु आहेत. त्यामुळे हे सर्व बंद व्हायला हवं असे लोकांना वाटत आहे. पण ज्यांच्यावर हा जादूटोणा बंद करण्याची जबाबदारी आहे ते राजकीय लोकच आता निवडणुकीत निवडून येण्यासाठी जादू टोना करायला लागले आहेत. निवडून येण्यासाठी स्मशानात जाऊन अघोरी विधी करणे हे जादूटोणा विरोधी कायद्याचे उल्लंघन आहे. त्यामुळे अशा गुन्ह्यातील आरोपींना तत्काळ अटक करून त्यांचा निवडणूक लढवण्याचा अधिकार काढून घ्यायला हवा. तसेच अशा प्रकारचे गुन्हे अजामीनपात्र करायला हवेत. पण सरकारच अंधश्रद्धाळू असल्याने असे काहीही घडणार नाही.**



वाडा तालुक्यातील खारीवली बिलावली ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत विजयश्री मिळवण्यासाठी चक्क स्मशानात जाऊन जादूटोणा करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी जरी १० जणांवर जादूटोणा विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल केलेला असला तरी अजून कुणालाही अटक झालेली नाही आणि कदाचित अटक होणारही नाही. कारण निवडणुकीच्या राजकारणात सगळ क्षम्य असत. पण निवडणूक जिंकण्यासाठी राजकारणी लोक आज लिंबू, नारळ, हळद-कुंकू, काळ्या बाहुल्या यासारख्या काळ्या विधीचा वापर करायला लागले. तर उद्या निवडणुका जिंकण्यासाठी कोंबड्या, बकरे आणि पुढे माणसांचाही बळी द्यायला मागे पुढे पाहणार नाहीत अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत.

१६ ऑक्टोबर रोजी पालघर जिल्ह्यातील ३४२ ग्रामपंचायतीच्या निवडणुका पार पडल्या. यात वाडा तालुक्यातील ७० ग्रामपंचायतींचा समावेश होता. यामध्ये २ ग्रामपंचायती बिनविरोध होत्या, तर ६८ ग्रामपंचायतींमध्ये प्रत्यक्ष मतदान पार पडले. परंतु या मतदानापूर्वी निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांकडून जे कृत्य घडले ते संतापजनक आहे. खारीवली बिलावली या गावातील ग्रामपंचायतीची निवडणूक जिंकण्यासाठी काहींनी चक्क स्मशानात जाऊन काळी जादू केली. १४ ऑक्टोबरच्या रात्री ११.०० वाजता स्मशानात गेले आणि त्यांनी विधिवत जादूटोणा केला. त्यासाठी लिंबू, नारळ, काळी बाहुली, टाचण्या काळा दोरा, अंडी आदी वस्तू नेल्या होत्या. या प्रकरणी खारीवली पौलबारे येथे राहणारे कंत्राटदार दिप्तेश गोविंद पाटील यांनी वाडा पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवताच पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता जादु टोन्याची सर्व सामुग्री आढळली. तसेच त्या ठिकाणी गोलाकार ...पान ६ वर

# अनैतिक संबंधामुळे संसाराचा शेवट झाला प्रियकरासाठी पत्नीने डॉक्टरचा गेम केला

नाशिक/क्राईम रिपोर्टर



**मोठ्या घरचे पोकळ वासे असे म्हटले जाते ते काही खोटे नाही. कारण उच्च शिक्षित लोक सुद्धा गुन्हेगारी प्रवृत्तीचे असू शकतात आणि त्यांच्या मार्गात अडथला ठरणाऱ्या माणसाचा ते अत्यंत थंड डोक्याने कशाप्रकारे काटा काढू शकतात हे नाशिक मधील एका डॉक्टरच्या गूढ मृत्यू प्रकरणातून उघडकीस आले आहे. नाशिक मधील एका नामांकित डॉक्टरच्या पत्नीचे दुसऱ्याशी अनैतिक संबंध होते. मात्र या संबंधाची कुणकुण तिच्या पतीला लागताच तिने इंजेक्शन मधून गुंगीचा ओव्हरडोस देऊन पतीचा काटा काढला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

नाशिकमध्ये एका नामांकित डॉक्टरची हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला जातोय. या डॉक्टरची गेल्या ३२ दिवसांपासून मृत्यूशी झुंज सुरु होती. अखेर त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सतीश देशमुख असं मृत्यू झालेल्या डॉक्टरचं नाव आहे. नाशिकच्या पंचवटी परिसरातील सतीश देशमुख यांच्या मृत्यूनंतर एकच खळबळ उडाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे डॉक्टर सतीश देशमुख यांच्या मृत्यूनंतर आता पोलिसांनी गुन्हा नोंदवून घेतलाय. म्हसरुळ पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करत आहेत. डॉ. सतीश यांच्या मृत्यूमागे पहिला थेट संशय त्यांच्याच पत्नीवर घेण्यात आला आहे. पत्नीने डॉक्टर सतीश यांना भुलीचं औषध देऊन जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता, असा आरोप करण्यात आला आहे. खुद्द डॉ. सतीश यांनी आपल्या मुलाला याबाबत सांगितलं असल्याची माहिती समोर आलीय. डॉक्टर सतीश यांच्या मुलानेच डॉ. सतीश यांच्या पत्नीविरोधात पोलिसांत फिर्याद दिली होती. डॉक्टर सतीश यांना पत्नीनेच जीवे मारण्याचा प्रयत्न का केला? असा प्रश्न आता उपस्थित केला जातोय. या प्रश्नाचं उत्तर शोधण्याचं आव्हान पोलिसांसमोर उभं ठाकलंय. डॉक्टर सतीश देशमुख यांना पत्नीच्या अनैतिक संबंधांची कूणकूण लागली होती. त्यामुळे त्यांचा पत्नीशी वाद झाला होता, असंही सांगितलं जातंय. या वादानंतर पत्नीने पतीचा काटा काढण्यासाठी हत्येचा कट रचला होता, असा आरोप करण्यात आलाय. देशमुख यांच्या पत्नीने आणि तिच्या प्रियकराने डॉक्टरला रुग्णालयातीच एका खोलीत डांबून ठेवलं होतं. त्यानंतर भुलीचं इंजेक्शन देऊन त्यांना जीवे मारहण्याचा प्रयत्न केला होता. या सर्व प्रकाराची माहिती डॉक्टर देशमुख यांनीच आपल्या मुलाला दिली होती. त्यानंतर त्यांच्या मुलाने म्हसरुळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. गेल्या ३२ दिवसांपासून डॉक्टर सतीश देशमुख यांच्यावर उपचार सुरु होते. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत होती. अखेर उपचारादरम्यान आता त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे या प्रकरणाला वेगळं वळण लागलंय. या संपूर्ण प्रकरणी म्हसरुळ पोलीस आता नेमकी काय कारवाई करतात, हे पाहणं महत्त्वाचंय.

## संशयाने वागणे जीवघेणे ठरले पतीने पत्नीला जिवानीशी मारले

मिरज/क्राईम रिपोर्टर



**माणसाला एकदा का संशयाने पछाडले कि मग त्याचे मानसिक स्वास्थ बिघडते आणि ज्याच्यावर त्याचा संशय असतो त्याचाच विचार सतत त्याच्या डोक्यात असतो. त्यातून पुढे त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि मग अशा माणसाच्या हातून काहीही घडू शकते. मिरज जवळच्या बामनोली येथे अशाच एका घटनेत पती कुमार जाधव सतत त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घ्यायचा. त्यातून त्याला दारूचे व्यसन लागले आणि एके दिवशी दारूच्या नशेत त्याने पत्नीची हत्या केली. पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे.**

मिरजेजवळील बामनोली येथे कुमार जाधव हा पत्नी सुनंदा आणि तीन मुलीसह भाडयाच्या घरात राहयला आहे.त्याचे लग्न २०१३ मध्ये समाजाच्या रितीरिवाजानुसार झाले.कालातरांने त्यांना दोन मुले ही झाली.त्याचा संसार बहरत फुलत असताना त्याच्या डोक्यात सुनंदा हिच्या चारित्र्याचा संशय निर्माण होत होता. ...पान २ वर

## अरविंदच्या पत्नीने वॉचमनला पटवले पतीला तिने आपल्या मार्गातून हटवले



लातूर/अमर करकरे



मयत अरविंद

**दारुडा आणि संशयखोर पती असला कि मग कुठलीही बाई अशा माणसाच्या सोबत संसार करू शकत नाही. तिला दुसऱ्याच्या आधाराची गरज भासू लागते. अरविंद पिटला याच्या पत्नीचेही तसेच झाले. पती रोज दारू पिऊन मारझोड करायचा. त्यामुळे तिने ती जिथे काम करायची तिथल्या सुरक्षा रक्षकाशी संबंध जुळवले आणि एके दिवशी त्याच्या मदतीने पतीला मार्गातून हटवले. मात्र पती बेपत्ता असूनही पत्नीने पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली नाही म्हणून पोलिसांना संशय आला आणि याच संशयावरून पोलिसांनी आरोपी पत्नी व तिच्या प्रियकराला अटक केली.**



१० ऑक्टोबर २०२२ रोजी मौजे बाभळगाव शिवारातील गट नंबर १० मधील विनायक देशमुख यांच्या शेताजवळ असलेल्या कॅनल मध्ये एक पुरुष जातीचा मृतदेह पाण्यात तरंगत असल्याची बातमी बाभळगाव शिवारात वाऱ्यासारखी पसरली. परिसरातील दक्ष नागरिकांनी लातूर ग्रामीण पोलिसांना संपर्क करून घटनेची माहिती दिली. बाभळगावचे बिट अंमलदार उत्तम देवके यांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. घटनास्थळावर अंदाजे ३० ते ४० वषीय पुरूष जातीचा मृतदेह पाण्याच्या वर तरंगत होता. त्याच्या कमरेला दोरीच्या साहाय्याने ...पान २ वर

## पतीच्या पापात पत्नीने साथ दिली दोन वर्षांची चिमुरडी जीवानिशी गेली

नंदुरबार/क्राईम रिपोर्टर



**काही लोक राक्षसी प्रवृत्तीचे असतात आणि त्यांच्या पोटात दारू गेली कि अक्षरशः त्यांच्या अंगात सैतान संचारतो. आणि दारूच्या नशेत त्यांना कशाचेही भान राहत नाही. गुजरात मधील चौथान येथून एक महिला व तिचे तीन साथीदार मजुरीसाठी नंदुरबारला येत होते. यावेळी त्यांना वाटेत दोन वर्षांची चिमुकली रडताना दिसली. वास्तविक त्यांनी त्या मुलीला मायेचा हात देऊन तिच्या पालकांच्या स्वाधीन करायला हवे होते. पण तसे न करता त्यातील एका नराधमाने दारूच्या नशेत तिच्यावर अत्याचार केले आणि तिची हत्या केली. यावेळी त्याच्या सोबत असलेली त्याची पत्नी इतकी निष्ठुर बनली होती कि तिने आपल्या पतीच्या या राक्षसी कृत्यात त्याला मदत केली. मुलीचा जीव गेला, पण त्या महिलेसह चारही आरोपी आता पोलिसांच्या ताब्यात आहेत.**

नंदुरबार शहरातील रेल्वे कॉलनी परिसरातील रेल्वे नियंत्रण कक्षाजवळच्या शौचालयाच्या टाकीतील पाण्यावर मंगळवार दि. ५ जुलै २०२२ रोजी सकाळी एक साधारणतः दोन वर्षाची मुलगी मृतावस्थेत तरंगतांना नागरिकांना दिसली. ...पान २ वर

## शुल्लक वाद अखेर प्राणावर बेतला शुभमने टेंपो चालकाचा जीव घेतला

नाशिक/क्राईम रिपोर्टर



मयत पंकज

**काही लोक असे असतात कि त्यांना कुणी शिवीगाळ केली कि त्यांच्या संतापाचा कडेलोट होतो आणि रागाच्या भरात ते एखाद्याचा जीव घ्यायलासुद्धा मागे पुढे पाहत नाहीत. दाभाडी गावात राहणाऱ्या पंकज मानकर या टेंपो चालकाच्या गाडीला शुभमच्या गाडीने कट मारली यावरून दोघांमध्ये भांडण झाले. या भांडणात पंकजने शुभमला आई-बहिणीवरून शिव्या घातल्या. त्याचा शुभमला भयंकर राग आला होता आणि याच रागातून त्याने पंकजला काही दिवसांनी कट रचून ठार मारले. मात्र या हत्येचा उलगडाच होत नव्हता, पण पोलिसांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून शेवटी आरोपी शुभमला अटक केली.**



नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात दाभाडी नावाचे गाव आहे. या गावामध्ये सुभाष पुंडलिक मानकर हे आपली पत्नी हिरूबाई आणि दोन मुले पंकज आणि राहुल यांच्यासमवेत रहातात. यातील पंकजने फायनान्सकडून टाटा ए.सी. ई. (छोटा हत्ती) वाहन विकत घेतले होते. त्या वाहनातून तो स्थानिक लोकांचे कांदे, भाजीपाला व सेंट्रींग मटेरियल अशा मालाची भाडेतत्त्वावर वाहतूक करत असे. पंकज हा अवघा २४ वर्षाचा तरूण. फायनान्सकडून कर्ज काढून त्याने हे वाहन खरेदी केले होते, साहजिकच त्याच्यावर कर्जफेडीची जबाबदारी असल्यामुळे दिवसभर तो कामातच असे. ...पान २ वर

## पूर्ववैमनस्यातून गोळीबार केला त्यात एका तरुणाचा जीव गेला



ठाणे/एस.कुमार

**१ ऑक्टोबर २२ रोजी मध्यरात्री १२.१५च्या सुमारास कांदिवली पोलीस ठाणेच्या हद्दित न्यू लीक रोड, कल्पवृक्ष हाईटस बिल्डींगच्या समोर एका अज्ञात व्यक्तीने मोटरसायकल वरून येऊन जवळील पिस्टल मधून अंदाधुंद गोळीबार करून दुचाकीवरून पळ काढला होता. या गोळीबारात एक तरुण ठार तर तिघे जण जखमी झाले होते. घटनेची माहिती मिळताच कांदिवली पोलीस आणि गुन्हे शाखेचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते.**

दरम्यान या गोळीबारात चौघेजण जखमी झाले होते.या चौघांना तातडीने शताब्दी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र या गोळीबारात गंभीर जखमी झालेला अंकित यादव या तरुणाचा मृत्यू झाला होता. तर अविनाश दाभोळकर, मनिष गुप्ता आणि प्रकाश नारायण हे तीन तरुण जखमी झाले होते. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. या तिघांची प्रकृती धोक्याबाहेर ...पान ६ वर

## टायगर टोळीतील वर्चस्वाचा वाद पेटला प्रकाशभाईचा साथीदारांनीच जीव घेतला



बेळगावी/क्राईम रिपोर्टर

**कोणत्याही टोळीत वर्चस्वाची लढाई असतेच. कारण जे भाईगिरीकरणारे असतात त्या प्रत्येकाला वाटत असते कि आपणच त्या टोळीचा बॉस बनावे आणि त्यातूनच आपापसात दुष्मनी सुरु होते. टायगर गँगमध्ये तसेच झाले. सध्या टोळीचा प्रमुख असलेल्या प्रकाश पाटील याच्याशी त्याच टोळीतील ससा नावाच्या गुंडाशी वाद झाला. पण ससा याने अगोदरच काही गुंडांना आपल्या बाजूने वळवले आणि एके दिवशी त्या सर्वांनी संधी साधून प्रकाशचा गेम केला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.**



कोणत्याही तरूणांच्या गटात वाद हा असतोच त्याला टायगर गॅग ही अपवाद नव्हती. टायगर गॅगमधील प्रकाश पाटील हा गेल्या दोन वर्षापूर्वी झालेल्या खूनातील मुख्य संशयीत आरोपी होता.तो गेल्या सहा महिन्यापूर्वी जेलमधून जामीनावर बाहेर आला. त्याची आपल्याच गॅगमधील शशिकांत उर्फ ससा उर्फ जट्टु भिमशी मिसाळे याच्याबरोबर दुश्मनी होती. त्या दोघात कधीच पटत नव्हते. सारखे त्या दोघात भांडणे होत होती. गॅगमधील काही जणांनी त्याचे भांडण मिटविण्याचा बऱ्याचवेळेला प्रयत्न केला परंतु त्याचे भांडण आणि वैरवाद काही संपत नव्हते. एव्हाना त्या दोघातून आता विस्तव ही जात ...पान ६ वर

17 TO 23 OCTOBER 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 10/15/2022 9:59 PM Page 1



पान १ वरून....

## संशयाने वागणे जीवघेणे ठरले...

ती सारखी आपल्या माहेरी जात होती.तिचे माहेर सोलापुर जिल्हयातील पंढरपुर तालुक्यातील तावशी हे होते.सुनंदा ही दिसायला देखणी आणि सुंदर होती. कुमार हा कुपवाड येथील एका कारखान्यात कामाला होता. तो सकाळी कामाला गेला रात्री उशिराच घराकडे परतत होता. दिवसभराच्या कामाने त्याची शिणवाट होत होती. त्यामुळे तो लवकर थकून जात होता.अलिकडे तर तो दारूच्या व्यसनाच्या आहारी गेला होता.रोज कामावरून घरी परत येताना तो दारू पिऊनच येत होता.त्यामुळे सुरूवातीला किरकोळ आणि क्षुल्लक कारणावरून सुनंदा बरोबर भांडणे होत होती.या भांडणात तो तिला लाथाबुक्कांनी मारहाण करीत होता.तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तुझे कोणाबरोबर लफडे आहे तेच सांग नाही तर तुला जिंवत सोडत नाही असे म्हणत होता. त्यामुळे ती ही त्याच्यावर चिडत होती. नवरा बायकोची भांडणे शेजाऱ्यांनी बऱ्याचवेळेला सोडवली होती. तरी ही तो काही ऐकत नव्हता. अलिकडे तर तो कामाला जात नव्हता.कायम दारूच्या नशेत राहून घरातच राहत होता. एक प्रकारे तो बायकोवर नजर ठेवूनच होता. तिने त्याला बऱ्याचदा सांगितले की माझे कोणाबरोबर लफडे नाही, तसले संबंध नाही तरी ही त्याचा तिच्यावर विश्वास बसत नव्हता. भांडणात तो तिला मारहाण करीत असताना घाणेरडया शिव्या देत असल्याने शेजार पाजारी ही वैतागले होते. भांडणे झाली की सुनंदा ही आपल्या माहेरी निघून जात होती. ती माहेरी गेली की तो घरात एकटाच असल्याने त्याच्या मनात आणि डोक्यात तिचाच विषय असायचा.ती कोणाबरोबर काय करत असेल याचाच तो विचार करीत होता. नुसत्या संशयाने तो पछाडलेला होता. त्या दोघातील भांडणे जवळच्या नातेवाईकांना ही माहित असल्याने त्यांनी ही त्याला समाजावून सांगितले होते. पण त्याच्या डोक्यातून तिच्या चारित्र्याचा संशय काही जात नव्हता. अलिकडे तर ती भांडणात त्याला जशास तसे उत्तर देत असल्याने तो तिच्यावर जास्तच चिडत होता.त्याला अद्दल घडविण्यासाठी तिने ही त्याच्या विरोधात पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. पोलीसांनी त्याला पोलीस ठाण्यात बोलावून समज ही दिली होती.तरी ही त्याच्यात काही सुधारणा होत नव्हती.ती पोलीस स्टेशनला गेली की त्याचे धाबे दणाणत होते. कारण त्याला पोलीसांचा हिसका चांगला माहित होता. त्याचे सगळे दिवस भांडण करण्यात जात होते. त्यामुळे प्रगती ही काही होत नव्हती. सुंनदा ही संसाराला हातभार लागावा म्हणून बाहेर कामाला जात होती.ती कामाला गेली की त्याचे पित्त खवळत होते. कुठला तरी संबंध तो कुठे तरी जोडत होता. ती बिचारी त्याचा मार खात तीन मुलीच्याकडे बघून कसा तरी संसार करीत होती. माहेरी गेलेली सुनंदा लवकर परत येत नाही याचा ही तो अर्थ वेगळा लावत होता. खरे तर त्याची विचार करण्याची मतीच खुटंली होती. तो वेगळाच विचार करीत होता. पै पाहुण्यांनी त्याला किती ही सांगितले तर तो तेवढया पुरते त्यांना हो म्हणत होता.त्याचे मागचे तसे पुढे चालू होते. दररोज दारू पिऊन भांडण करणे हेच त्याला माहित होते. बुधवार दि. ५ ऑक्टोंबर रोजी रात्री तो नेहमीप्रमाणे कामावरून दारू पिऊनच घराकडे आला. त्याला नीट उभे ही राहता येत नव्हते.तरीही तो आपण शुध्दीत असल्याचे नाटक करीत घरात आला.सुनंदा ही घरात स्वयंपाक करीत होता. घरात तो तिच्यावर ओरडतच आला. बाजुच्या खोलीत तीन्ही मुली झोपल्या होत्या.सुनंदाला तो घाणेरडया शिव्या देत होता.ती त्याच्याकडे लक्ष देत नव्हती. आपण घराकडे आलो तरी ती आपल्याकडे लक्ष देत नाही म्हणून तो तिच्यावर दात ओठ खात त्याने तिच्या केसांना धरले.तुला नवरा नको आहे तु जा कोणाकडे जातेस ते म्हणत त्याने तिला घराबाहेर फरफरटत आणले. तिला लाथा बुक्कांनी मारहाण करीत खाली पाडले.शेजाऱ्यांनी ही दररोजची भांडणे आहेत म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष केले. तो तिला जबर मारहाण करीत होता.ती मात्र त्याला हात जोडत मला मारू नका, मला सोडा असे म्हणत होती. सांग तुझे लफडे कोणाबरोबर आहे ते तू रोज कोणाबरोबर मोबाईलवरून तासन तास बोलत असतेस म्हणत तो तिला लाथा घालत होता. त्याला राग अनावर झाला होता.तेवढयात त्याला कोपऱ्यात एक बांबु पडला असल्याचे दिसले. त्याने तो बांबु उचलून तिच्या डोक्यात दोन तीनदा हाणले.त्यासरशी तिच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होऊन ती जमीनीवर पडली. तिची हालचाल मंदावली होती. ती निपचप पडली असल्याचे बघून तो भानावर आला. त्याची दारूची नशा पुर्ण उतरली.आता आपले काही खरे नाही हे ओळखून त्याने काही तरी करायचे म्हणून शेजारच्या रिक्षावाल्याला बोलावून घेतले. तिला उपचारासाठी सांगली सिव्हिलला न्यायचे आहे असे सांगून त्याने तिला रिक्षात घातले.सांगली सिव्हिल हॉस्पिटल हॉस्पिटलमध्ये आणले. तेथील डॉक्टरांना आपली बायको फरशीवरून पाय घसरून पडल्याने तिच्या डोक्याला जबर जखम झाली आहे असे सांगितले. डॉक्टरांनी तिचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितल्यावर तो डॉक्टरांना बाहेर माझे पाहुणे आहेत असे सांगून त्यांना निरोप देतो म्हणून जो बाहेर पडला तो परत आलाच नाही. सिव्हिल प्रशासने त्याची वाट बघून तेथील डॉक्टरांनी या घटनेची माहिती कुपवाड पोलीसांना दिली. पोलीस ही तातडीने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पोहचले. त्यांनी या घटनेची पुर्ण माहिती घेऊन सिव्हिल हॉस्पिटलमधील सीसीटीव्हीचे फुटेज तपासले.या फुटेजमध्ये तो मयत सुनंदाला दाखल करताना आणि काही वेळाने तो गेटच्या बाहेर जाताना दिसत होता. मयताच्या डोक्याला कशाच्या तरी जाड वस्तुने प्रहार केल्याने मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याचे दिसत होते.पोलीसांनी मयताचा पंचनामा करून शवविच्छेदन सिव्हिलमध्ये केले. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत सुनंदा हिच्या माहेरच्या लोकांना दिल्याने ते ही तातडीने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पोहचले होते. घटनास्थळी पोलीस अधिकारी अशोक विरकर यांनी भेट देवून घटनेची माहिती घेतली. कुपवाड पोलीस या घटनेचा तपास करीत होते. या घटनेची लेखी फिर्याद मयत सुनंदा हिचा भाऊ सतिश जगदाळे याने कुपवाड पोलीसात दिली. त्याने पोलीसांना सांगितले की, तिच्या बहिणीचा नवरा कुमार जाधव हा सुनंदा हिच्या चारित्र्याचा संशय घेऊन नेहमी तिला मारहाण करीत होता. त्यानेच तिला मारून टाकले आहे. इकडे पोलीस पळून गेलेल्या कुमार जाधव याचा शोध घेत असताना गुरूवारी तो पोलीसांच्या गळाला लागला. त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी पोलीसांनी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला? याची माहिती पोलीसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर सतिश जगदाळे याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी सुनंदा कुमार जगदाळे (वय ३०) हिच्या खून प्रकरणी कुमार भिमराव जाधव (वय ३२) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला लाकडी बांबु जप्त केला. या घटनेचा तपास कुपवाड पोलीस स्टेशनचे स.पो.नी. अविनाश पाटील, हवा. गजानन जाधव, संदीप पाटील, सतीश माने, महादेव नागणे यांनी केला. नवरा बायकोची भांडणे विकोपाला गेली की, त्यातून खूनासारखी अनर्थ ठरणारी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## अरविंदच्या पत्नीने वॉचमनला...

दगडासारख्या जाड वस्तूने बांधलेले दिसत होते. बहूतेक हा घातपाचा संशय आसल्याचा प्राथमिक अंदाज लोकांकडून वतविला जात होता. बिट अंमलदार उत्तम देवके यांनी घटनास्थळावरील प्राथमिक माहीती हास्तगत करीत वरीष्ठांना खबर केली. माहिती मिळताच लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळाकडे धाव घेतली. पोलिस ठाण्यापासून पाच साहा किलोमिटर अंतरावर आसलेल्या कॅनल परीसरात पोलिसांची गाडी आली. घटनास्थळावर लोकांनी एकच गर्दी केली होती. पोलिसांना पाहताच गर्दीने काढता पाय घेतला. लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांनी घटनास्थळाची प्राथमिक घेण्यास सुरूवात केली. मृतदेहाचे बरीक निरीक्षण केले असता मृतदेहाच्या कमरेला काहीतरी वस्तू बांधल्याचे प्रथमदर्शी दिसत होते. यावरून त्याचा कोणीतरी खून करून मृतदेह नष्ट करण्याच्या हेतूने हा प्रकार केला असावा असा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून वर्तविण्यात येत होता.दरम्यान घटनास्थहाला लातूर ग्रामीणचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुनिल गोसावी यांनी भेट दिली. त्यांनी पोलिस अधिकारी आणी कर्मचारी यांना योग्य त्या सुचना करून पंचनामा करण्याचे आदेश दिले. लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यातील काही खास कर्मचाऱ्यांनी पाण्यात उतरून मृतदेह बाहेर काढून पंचनामा करण्याची तजवीज केली.मृतदेह बाहेर काढताना मृतदेहाच्या कमरेला एक एक पीशवी बांधुन त्यात दगड टाकले आसल्याचे ठळकपणे दिसत होते. तसेच मृतदेहाचे दोन्ही हात व पाय दोरीने बाधले होते. मारेकऱ्यांनी सदरील इसमाला मारून पुरावा नष्ठ करण्याच्या उद्देशान हा सारा प्रकार केला होता. पोलिसांनी मृतदेह पाण्याच्या बाहेर घेवून ओळख पटविण्यासाठी काही पुराव मिळतो का याची चाचपणी सुरू केली. पंचासमक्ष मयताची आंग झडती घेतली असता त्याच्या पॅन्टीच्या खिशात एक मोबाईल आढळून आला. तसेचे काही कागदपत्रही आढळून आले त्यावर त्याचे नाव आरविंद नरसिंग पिटले आसे असून तो देवणी तालुक्यातील बालाजी वाडी येथील आसल्याची माहीती पोलिसांनी हास्तगत केली. अशा पध्दतीन मयताची ओळख पटविण्यात पोलिसांना यश आले.पोलिसांनी तात्काळ देवणी पोलिसांना संर्पक करून सदरील इसम त्या गावातील आहे का याची पुष्ठी केली. मयत आरविंद तो बालाजीवाडी गावातीलच असून गेल्या काही दिवसापुर्वी तो लातूर येथे स्थाईक झाला आसल्याचे पोलिसांना कळाले .यावरून लातूर ग्रामीण पोलिसांनी मयत आरविंद पिअले यांच्या नातेवाईकांना बोलावून घेतले. घटनास्थळावरील आश्यक ती माहीती घेवून पोलिसांनी मृतदेह उत्तरणीय तपासणीसाठी शासकीय रूग्णालयात पाठविले. काही वेळातच मयत आरविंद पिटले यांचे नातेवाईक लातूरच्या शासकी रूग्णालयात दाखलल झाले.त्यांनी मृतदेह पहाताच हंबरडा फोडण्यास सुरूवात केली. दरम्यान पोलिसांनी आधिक माहीती घेतली असता मयत आरविंद पिटले याची बायको लातूर शहरातील ठाकरे चौकात भाडेतत्वावर राहत आसल्याचेही समोर आले. पोलिसांनी तिच्याशी संर्पक करून तिला बोलावून घेतले. तिच्याकडे आधिक चौकशी केली असता गेल्या तिन दिवसपासून मयत नरसिंग बेपत्ता आसल्याचे तिने पोलिसांना सांगितले. येथेच पोलिसांच्या मनात शंकेची पाल चुचकली. नवरा तीन दिवसापासून बेपत्ता आसूनही पत्नी एवढी बिनधास्त कशी असाच प्रश्न लातूर ग्रामीणचे पोलिस निरीक्षक गणेश कदम यांच्या डोक्यात घर करून राहील. दरम्यान सरकारी फिर्यादीवरून लातूर ग्रामीण पोलिस ठाण्यात अज्ञात मारेकऱ्यांनी अज्ञात करणासाठी आरविंद पिटले याचा खून केला अश्या तक्रारीवरून गुरनं.२०८/ २२ कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, पोलीस अधीक्षक अनुराग जैन, लातूर ग्रामीण उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची सर्व सूत्रे लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांच्या हाती देण्यात आले. .तसेच जिल्हाभरातील सर्व पोलिस ठाण्यांना समांतर तपासाचे आदेश देण्यात आले. लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांनी तपासाची चक्रे गतिमान करून या प्रकरणातील प्राथमिक माहिती घेण्यास सुरुवात केली . या प्रकरणातील प्राथमिक माहिती घेण्यासाठी लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे एक पथक तयार केले.या पथकात साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रतिभा ठाकूर, पीएसआय पाटील, पोलीस हेडकॉन्स्टेबल चंद्र पाटले,राहूल दरोडे,अनिल जगदाळे, उत्तम देवकी यांचा समावेश करण्यात आला. या पथकाने सर्वप्रथम देवणी तालुक्यातील बालाजीवाडी हे गाव गाटले. या गावात जाऊन त्यांनी मयत अरविंद नरसिंग पिटले यांची माहिती घेण्यास सुरुवात केली. मूळचा बालाजीवाडी येथील रहिवासी असलेले अरविंद नर्सिंग पिठले हे आपली पत्नी सुनीता सोबत राहत होते. अरविंद पिटले हा शेतमजूर म्हणून काम करत होता. तर सुनिता पिटले आपल्या नवऱ्याच्या कामात मीळल ते काम करून मदत करत होती.पिटले दाम्पंत्यांना दोन मुली होत्या.काही वर्षापुर्वी त्या दोन्ही मुलींचे लग्न झाले होते. तयामुळे आरविंद व सुनिता हे दोघेच बालाजीवाडी येथे राहात होते. दरम्यान मुलीचे लग्न याच्यासाठी आपली वडिलोपार्जित असलेली एक दीड एकर शेती अरविंद पिटले यांनी विकली होती. सुरूवातीच्या काळापासूनच आरविंद पिटले याला दारूचे व्यसन जडले होते. दिवसभर काम करून रात्री दारू पिणे हा त्यांचा नित्याचा नियम झाला होता त्यामुळे पिटले कुटूंबात वातावरण अशांत झाले होते. दररोज या ना त्या कारणावरून पती पत्नीच वाद होते होते. घरची आर्थिक स्थती बिघडली होती. त्यासाठी सुनिता पिटले अधून मधून शेतकामाला तर कधी कधी बालाजीवाडी येथून जवळच आसलेल्या कारखान्यात रोजेदारीवर काम करत होती. दरम्यान काही महिन्यापूर्वी सुनिता पिटले गावापासून जवळच असलेल्या एका कारखान्यात कामाला लागली होती. सदरील कारखान्यात काम करत असताना सुनिता पिटले हिची ओळख कारखान्यातील वॅचमन म्हणून काम करणाऱ्या सुभाष शिंदे यांच्या सोबत झाली. सुभाष शिंदे हा मूळचा चाकूर तालुक्यातील घरणी येथील रहिवासी होता. सुभाष शिंदे गेल्या अनेक वर्षापासून तो त्या कारखान्यावर वॉचमेन म्हणून कार्यरत होता. सुभाष शिंदे हा दररोज कारखान्यावरून सुट्टी झाल्यास आपल्या घरणी या गावी जात होता. अधून मधून कधी कामावर उशीर झाल्यास तो कामाच्या ठिकाणीच कारखान्यावर राहत होता. अशातच सुनिता आणी सुभाष यांची चांगली ओळख झाली. सुभाष शिंदे कधी कारखान्यावर मुक्कामी राहील्यास आधून मधून सुनिता सुभाषसाठी जेवनाचा डब्बा सोबत घेवून येवू लागती. यातूनच या दोघांची चांगलीच ओळख वाढली. आधून मधून कारखान्यावर मुककामी राहणारा सुभाष आता नेहमीच कारखाव्यावर मुक्कामी राहू लागला. दरम्यान सुभाष शिंदे यांने सुनिताकडे मेसचा डब्बाच लावला. घरगुती खानावळची निमीत्त करून सुभाष शिंदे थेट सुनिताच्या घरी जावू लागला. ही गोष्ट सुनिताचा पती आरविंद याला आवडत नासली. तरी तो गप्पच होता. मेसचा डब्याचे निमित्ताने सुभाष सारखा सुनिता पिटले यांच्या घरी जाऊ लागला. यातूनच सुनिता आणी सुभाष यांच्यात जवळीकता वाढली. नेहमी दारूच्या नशेत राहणार आरविंद याला यांचा थंगपततताही नव्हता. घरगुती खानावळीच्या निमीत्ताने सुभाष आता थेट सुनिताच्या धरी जावू लागला. तो आगदी घरातील माणसाप्रमाणे वागू लागता. ही गोष्ट शेजाऱ्या पाजाऱ्याच्या नजरेतून सुटली नाही. गावात कजबुज सुरू झाली. त्यातूनच आरविंद पिटले यालापण सुभाषचे सारखे घरी येणे खटकू लागले. आरविंद पिटले आपल्या पत्नीच्या चारीत्र्यावर संशय घेवून तो सारखा भांडू लागला. गावात आपली बदनामी होत आसल्याचे सुनिताच्या लक्षात आले. अशातच सुभाषपण लोकांच्या नजरा चुकवून सुनिताकडे येवू लागला. दरम्यान सुभाषने सुनिताची एकांतात भेट घेवून गाव सोडून लातूर शहरात जावू आणी तेथे तुला काम मिळवून देतो आसा सल्ला दिला. तो सल्ला सुनिताला पटला. सुनिताने आरविंदला गोडीत घेवून आपण लातूरला जावू आणी तेथेच काहीतरी काम करू आस पटवून सांगितल. त्यावर आरविंदनेपण होकार दिला. २६ सप्टेंबर २२ रोजी आरविद आणी सुनिता लातूर शहरातील ठाकरे चौकात भाड्याने घर करून राहू लागले. एवढी माहीती पोलिसांनी हास्तगत केली. हाती आलेल्या माहीतीवरून लातूर ग्रामीणचे पोलिस निरीक्षक गणेश कदम यांनी या प्रकरणातील संशयीत आरोपी सुभाष शिंदे याला कारखाना साईटवरून ताब्यात घेतले त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्यांने पोलिसांना असमाधानकारक उत्तरे दिली. पोलिसी खाक्या दाखवताच सुनिताच्या मदतीने आरविंद याचा गळा आवळून प्रेत कॅनलमध्ये टाकल्याचे कबूल केले.आणी सांगण्यास सुरूवात केली. सुनिताला लातूरला आणण्याचा प्लॅन यशस्वी झाला होता. आरविंद कामानिमीत्त बाहेर गेला की, सुनिता आणी सुभाषला एकांत वेळ मिळू लागला. दरम्यान सुभाष आधून मघून सुनिताकडे येत आसल्याचे आरविंदच्या लक्षात आले होते. यावरूनच आरविंद सुनिताला दारू पिवून शिवीगाळ करत होता. सुनिताला नवीन जोडीदार मिळाल्याने ती नवीन स्वप्न रंगवत होती. गावाकडे आसताना लोकांच्या आडचणी येत होत्या आता लातूर मध्ये आरविंदच दोघाच्या आड येत होता. त्यामुळे सुनिता आणी सुभाषणे आरविंदचा कायमचा काटा काढण्याचे ठरविले. त्यासाठी आरविंदला भरपूर दारू पाजून औसा रोडवरील एका धाब्यावर जेवनाचे निमीत्त करून आणले. तेथेही त्याला दारू पाजली. एकाच मोटर सायकलीवर हे तिघेजण बाभळगाव येथे आल. दारूच्या नशेत तर्र आसलेल्या आरविंदचा गळा आवळून त्याचा खून केला. पुरावा नष्ट करणयासाठी त्याचे दोन्ही हातपाय दोरीने आवळून प्रेत पाण्यातून वरी येवू नये यासाठी कमरेला दगड बांधून प्रेत कॅनल मध्ये टाकले. पोलिसांनी या खून प्रकरधात आरोपींनी वारलेली मोटर सायकला जप्त केली असून पुढील तपास पोलिस निरीक्षक गणेश कदम करत आहे. सदरील कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, पोलीस अधीक्षक अनुराग जैन, लातूर ग्रामीण उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची सर्व सूत्रे लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रतिभा ठाकूर, पीएसआय पाटील, पोलीस हेडकॉन्स्टेबल चंद्र पाटले,राहूल दरोडे, अनिल जगदाळे, उत्तम देवकी यांनी केली.

## पतीच्या पापात पत्नीने साथ...

नागरिकांनी विनाविलंब या घटनेची माहिती नंदुरबार शहर पोलीस स्टेशनला दिली. त्यासरशी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरणकुमार खेडकर हे फौजफाट्यासह घटनास्थळी दाखल झाले. ज्या शौचालयाच्या पाण्याच्या टाकीत त्या अज्ञात बालिकेचा मृतदेह तरंगत होता. त्या टाकीभोवती बघ्यांची तुडूंब गर्दी होती. गर्दीला बाजूला करत किरणकुमार खेडकर यांनी परिसराची व घटनास्थळाची पहाणी करून तात्काळ ही माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक पी. आर. पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक विजय पवार व उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन हिरे यांना कळवली. ते तात्काळ घटनास्थळ आले. घटनास्थळासह मृतदेहाचा पंचनामा करुन मृतदेह पोस्टमार्टमकामी रवाना करण्यात आला. ७ जुलै २०२ रोजी त्या चिमुकल्या मुलीच्या मृतदेहाचा पोस्टमार्टम अहवाल पोलिसांच्या हाती आला. त्या दोन वर्षीय चिमुकल्या मुलीवर अज्ञात नराधमाने अत्याचार करुन तिचा गळा घोटल्याचे उघड झाले. त्या चिमुकल्या मुलीच्या मृत्यूचे कारण समजताच जिल्हा पोलिस प्रमुख पी. आर. पाटील यांनी हे प्रकरण गांभिर्याने घेतले. नंदुरबार पोलिस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक हेमंत मोहीते यांच्या फिर्यादीनुसार अज्ञात नराधमाविरुद्ध लैंगिक अत्याचार आणि हत्या करुन पुरावा नष्ट करण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. सर्वप्रथम पिडीत चिमुकल्या मुलीची ओळख पटवण्याचे व त्यानंतर गुन्हेगाराचा शोध घेण्याचे नियोजन करण्यात आले. नंदुरबार शहर पोलिस स्टेशन आणि स्थानिक गुन्हे शाखेचे एकुण सात पथके कार्यरत करण्यात आली. मात्र पथकाला कोणताही धागा दोरा सापडत नव्हता. केवळ तपास पथकावर अवलंबून न राहता पोलीस अधीक्षक पी.आर. पाटील यांनी आपले काही खबरे देखील कामाला लावले. क्रियाशिल माणसाच्या मदतीला ईश्वरही धावून येत असतो. जिल्हा पोलीस अधिक्षक पी.आर. पाटील यांच्या मदतीला देखील ईश्वर धावून आला. नंदुरबार शहरातील कंजारवाडा परिसरात शुक्रवार दि. ३ जुलै २०२२ रोजी एक महिला दोन वर्षाच्या मुलीसोबत फिरत होती. त्या महिलेसोबत आणखी चार जण होते. त्यांच्यासोबतच ती चिमुकली रडत असतांना मद्यधुंद अवस्थेतील सोबतची माणसे तिला दम देवून गप्प करण्याचा प्रयत्न करत होती अशी माहिती एका खबऱ्याने पोलीस अधीक्षक पी.आर.पाटील यांना दिली. त्या महिलेचे, तिच्यासोबत इतर चौघांचे वर्णन खबऱ्याने पोलीस अधीक्षकांना कथन केले. बुडत्याला काडीचा आधार या न्यायाचा आधार घेत पोलीस अधीक्षक पी. आर. पाटील यांनी स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर आणि त्यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या तपास पथकातील कर्मचाऱ्यांना बोलावून घेतले. त्यांना खबऱ्याकडून मिळालेली माहिती सांगितली. संबंधितांचे 'त्या' महिलेसह सविस्तर वर्णन सांगितले व त्या महिलेचा आणि तिच्याबरोबरच्या लोकांचा शोध घेण्याचा आदेश दिला. जिल्हा पोलीस अधीक्षकांचा आदेश मिळताच पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर यांच्यासह तपास पथक कामाला लागले. कंजारवाडासह नंदुरबार शहरातील सर्व भाग त्यांनी पिंजून काढला. शोधकार्य सुरु असतांना त्यांना नंदुरबारमधील एक महिला उड्डाणपुलाखाली आढळली. योगायोगाने त्या महिलेचे वर्णन दृष्यात असलेल्या महिलेशी जुळत होते. महिला अधिकारी आणि महिला कर्मचाऱ्यांच्या मदतीने पो.नि. रविंद्र कळमकर यांनी या महिलेला पोलीस अधीक्षकांसमोर हजर केले. खबऱ्याने केलेल्या वर्णनाशी त्या महिलेचे वर्णन जुळत असल्याचे पाहून पोलीस अधीक्षक पी. आर. पाटील यांनी तिला भावनिक संभाषणात गुंतवून प्रदीर्घ प्रयत्नाने बोलते केले. त्या महिलेचे नाव संगीता रणजीत पावरा असे होते. तिने सांगितलेल्या हकीकतनुसार पोलिसांचे अंग शहारुन गेले. संगीता रणजीत पावरा, तिचा नवरा रणजीत, तिचा नातेवाईक रविंद्र पावरा आणि त्यांचा सहकारी मुकेश आर्य यांची मजुरीच्या निमित्ताने भ्रमंती असते. संगीता, रणजीत, रविंद्र आणि मुकेश हे गुजरात राज्यातील चलथान गावातून नंदुरबारला येण्यास निघाले होते. चलथान गावात असतांना त्यांना ती दोन वर्षाची चिमुरडी रस्त्यात रडतांना दिसली. संगीताने त्या चिमुरडीची विचारपूस केली. पण ती हमसाहमशी रडतच होती. दारूच्या नशेत असलेल्या रणजीतने त्या मुलीला आपल्याबरोबर घे असे सांगितले. तसे संगीताने तिला उचलून आपल्या कडेवर घेतले. त्यानंतर ते सर्व जण रेल्वेने नंदुरबारला आले. शनिवार दि. ४ जुलै २०२२ रोजी नंदुरबार शहरातील कंजारवाडा भागातील हातभट्टीच्या दारु दुकानावर त्या सर्वानी मद्यप्राशन केले. दरम्यान रडून रडून दमलेली ती चिमुकली झोपली होती. सायंकाळी ते चौघे नंदुरबार शहरातील रेल्वे कॉलनीतील रेल्वे नियंत्रण कक्षाजवळ आले. रणजीत, रविंद्र आणि मुकेश पूर्णतः मद्याच्या धुंदीत होते. रात्री रणजीत या नराधमाने त्या दोन वर्षाच्या मुलीवर अत्याचार केला. आपला नवरा एका निरागस बालिकेवर अत्याचार करत असताना त्या नीच कृत्यापासून त्याला परावृत्त करण्याऐवजी संगीताने त्यावेळी पहारेकऱ्याची भूमिका बजावल्याचे तिने स्वतः निर्लज्जपणे सांगितले. रणजीत त्या चिमुकलीवर अत्याचार करतांना तिला होणा-या यातनांनी ती जीवाच्या आकांताने ओरडत होती. तरी त्या नराधमाला वा त्याच्या पत्नीला तिची दया आली नाही. उलट त्या चिमुकलीचा आवाज बंद करण्यासाठी त्या नरपशु रणजीतने त्या चिमुरडीचा गळा घोटून खून केला. तिचा मृतदेह रेल्वे कॉलनी परिसरातील रेल्वे नियंत्रण कक्षाजवळील संडासाच्या टाकीत फेकून दिला. संगीता पावराने दिलेल्या कबुली जबाबाने सर्व जण शहारले. संगीता पावरा हिचा कबुली जवाब ऐकताच तिला कायद्याच्या चौकटीत ताब्यात घेण्याचा आदेश पोलीस अधीक्षक पी. आर. पाटील यांनी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरणकुमार खेडकर यांना दिला. संगीताच्या सांगण्यावरून तिचा अत्याचारी पती नवापूरला असल्याचे कळले. त्यानुसार तातडीने हालचाली करुन नवापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांना रणजीतला ताब्यात घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे नवापूर पोलिसांनी रणजीतला ताब्यात घेतले. दरम्यान रविंद्र पावरा आणि मुकेश आर्य या दोघाना नंदुरबार शहरातून ताब्यात घेण्यात आले. या चौघांच्या विरोधात त्या चिमुकलीवर बलात्कार करण्याचा, तिचा खून करण्याचा आणि पुरावा नष्ट करण्याचा गुन्हा दाखल करून त्या सर्वाना गजाआड केले. कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पुरावा नसतांना तीव्र इच्छाशक्तीच्या बळावर नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक पी. आर. पाटील यांनी या संवेदनशील प्रकरणात वैयक्तीक लक्ष घालून पाठपुरावा करून गुन्हेगारांना शोधून काढत गुन्ह्यावर प्रकाशझोत टाकला. गुन्हेगारांना अटक करून त्यांच्यावर गुन्हाही दाखल झाला, पण दुर्दैवाने बळी गेलेली ती मुलगी कोण? कुठली ? तिचे आई-वडील कोण? यांचा मात्र ही घटना शब्दबद्ध होईपर्यंत थांगपत्ता लागू शकला नाही.

## शुल्लक वाद अखेर प्राणावर बेतला...

गावातील लोकांच्या माल वाहतुकीचे काम तो इमानेइतबारे करत असे. दिवसभर तो हे काम करत असे. दुपारी घरी जेवायला येवून तो घटकाभर विश्रांती घ्यायचा आणि पुन्हा तो आपल्या कामासाठी बाहेर पडायचा. शनिवार दि. २१ मे २०२२ रोजीचा दिवस. दुपारचे तीन-साडेतीन वाजले असावेत. पंकज हा उशीराच दुपारी जेवायला घरी आला होता. त्याचे जेवण चालू असतानाच त्याला कुणाचा तरी फोन आला. त्याला कुणाचे तरी भाडे मिळाले. होते. भाडे मिळाले म्हटल्यावर त्याने जेवण आवरते घेतले आणि साधारण ४ वाजण्याच्या दरम्यान तो घराबाहेर पडला. संध्याकाळ होत आली, रात्रही झाली, पण पंकज मात्र घरी परतला नव्हता. कदाचित बाहेरगावचे भाडे मिळाले असेल म्हणून त्याच्या घरच्यांनीही फारशी चौकशी केली नाही. पंकज उद्या नक्कीच घरी येईल या आशेवर ते झोपूनही गेले. दुसरा दिवस उजाडला. रविवार दि. २२ मे २०२२ चा तो दिवस. त्यादिवशी अंकुश सुरेश मानकर (वय ३३) हे पेशाने शिक्षक असलेले पंकजचे चुलत भाऊ पिंपळनेर येथे एका कामासाठी गेले होते, तेंव्हा त्यांना दाभाडी येथील फॉरेस्ट डिपार्टमेंटमध्ये नोकरीस असलेल्या सुनिल मानकर यांचा फोन आला. त्यांनी सांगितलेल्या दातमीने अंकुश यांना धक्काच बसला. सुनिल मानकर यांनी सांगितले की 'तुझा चुलत भाऊ पंकज सुभाष मानकर याचा मृतदेह गरबड गावातील पळाशी शिवारात पडलेला आहे. ही बातमी ऐकताच अंकुश मानकर हे काम तिथेच सोडून तातडीने घटनास्थळी गेले.. त्याठिकाणी आधीच पोलीस येवून पोहोचले होते. मृतदेहाची ओळख पटली होती. पोलीस आपली कार्यवाही करण्यात मग्न होते. गरबड गावातील पळाशी शिवारातील कच्च्या रोडच्या बाजूला पंकज सुभाष मानकर याची टाटा कंपनीची एसीई (छोटा हत्ती) क्र. एम.च.४१ ईजी. ४१३१ गाडी उभी होती. तेथून काही अंतरावर रक्त पडलेले होते. तेथून नदीकडे मृतदेह ओढत नेल्याचे दिसत होते. त्याच्यापुढे काही अंतरावर ठिकठिकाणी जमिनीवर रक्ताचे सडे पडलेले होते. पंकजचा चप्पल जोड एके ठिकाणी पडलेला होता. त्याचा मृतदेह बोरी नदीच्या पात्रात एका झाडाला अडकवलेल्या स्थितीत, दोन्ही हात कपड्याने बांधलेल्या स्थितीत अर्धनग्न अवस्थेत होता. या साऱ्या गोष्टीवरून कोणीतरी अज्ञाताने पंकजला ठार मारल्याचे स्पष्ट दिसून येत होते. अंकुश मानकर जेव्हा तिथे पोहोचले तेंव्हा पोलीस तिथे आपले काम करत होते. त्यांना कोणीतरी या घटनेची माहिती आधीच दिली होती, त्यानुसार वडनेर खा. पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देवेंद्र शिंदे. ए. एस. आय. अशोक सुर्यवंशी, हवालदार मिलिंद सोनवणे, कॉन्स्टेबल वाघ आदी पोलीस अधिकारी-कर्मचारी घटनास्थळाचा आणि मृतदेहाचा पंचनामा करत असतांना अंकुश मानकर हे पुढे झाले. त्यांनी आपण मयताचा चुलत भाऊ असल्याचे सांगितले. मयताचे नातेवाईक घटनास्थळी आल्याने पोलिसांनी त्याच्याकडून फिर्याद नोंदवून घेत मयताबद्दल चौकशीही केली.

याप्रकरणी अंकुश सुरेश मानकर (वय ३३, रा. दाभाडी, ता. मालेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात मारेकऱ्याविरोधात वडनेर खा. पोलीस ठाण्यामध्ये त्यानुसार गुन्हा रजि. नं. ७८/२०२२ भा.दं.वि. ३०२, २०१ कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांच्याकडे. केलेल्या अधिक चौकशीत पंकज मानकर याच्याकडे छोटा हत्ती हे मालवाहतुकीसाठीचे वाहन होते. ते वाहन तो माडेतत्वावर माल वाहतुकीसाठी वापरत असल्याचे समजून आले. तसेच शनिवार दि. २१ मे रोजी दुपारी ४ वाजता तो मालवाहतुकीसाठी घरातून बाहेर पडला होता, त्यानंतर तो घरी परतला नसल्याची माहिती मिळाली. यावरून पंकज मानकर याचा खून दि. २१ मे २०२२ रोजी ४ वाजण्यापासून ते दि. २२ मे २०२२ रोजी सकाळी ११.४५ वाजण्याच्या दरम्यान केल्याचे समजून आले. मृतदेहाची ओळख पटली होती, पण त्याचा मारेकरी कोण ? हे शोधण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. घटनास्थळी कोणताही पुरावा नव्हता, त्यामुळे या युवकाच्या मारेकऱ्यापर्यंत पोहोचणे थोडे कठीणच काम होते, तरीही वडनेर खा. पोलीस ठाण्याचे पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी रात्र दिवस मेहनत घेवून, सतत पाठपुरावा करून चिकाटीने या गुन्ह्याचा तपास केला आणि अशक्यप्राय वाटणारी गोष्ट शक्य करून दाखवत आरोपीला गजाआड केले. शनिवार दि. २१ मे २०२२ रोजी पंकज हा उशिराच जेवणासाठी घरी आला. तो घरी असतांनाच त्याला कोणाचा तरी फोन आला आणि घरच्या लोकांना भाडे आहे असे सांगून तो बाहेर पडला. आपली गाडी घेवून तो गेला होता, त्यानंतर मात्र तो घरी आलाच नाही. त्याच्या मोबाईलवर घरच्या लोकांनी कॉल करून पाहिला, पण त्याचा मोबाईलही बंद लागत होता. पोलिसांनी घटनास्थळी काही पुरावा मिळतो का हे पहाण्यासाठी मोबाईलही शोधला, पण त्यांना तो मिळून आला नव्हता. याचा अर्थ मारेकल्याने तो हुशारीने नाहीसा केल्याचे दिसून येत होते. अगदी हुशारीने मारेक-याने कोणताही पुरावा मागे सोडायचा नाही हे काम चोख केले होते. इकडे दाभाडी गावात पंकजच्या घरी आपल्या मुलाचा खून झाल्याचे समजताच त्याच्या आई-वडीलांनी हंबरडा फोडला होता. सारा गाव पंकजच्या खुनामुळे संतप्त झाला. होता. एका होतकरू आणि कष्टाळू तरुणाचा खून झाल्याने सारा गाव हळहळत होता. पंकजच्या मारेकऱ्याचा शोध घेवून त्याला त्वरीत अटक करावी या मागणीसाठी गावामध्ये कॅंडल मोर्चाही काढण्यात आला. गावातील सर्व लाईटस् बंद करून घटनेचा निषेध करण्यात आला. पोलिसांवर दबाव वाढत चालला होता, पण आरोपीचा सुगावा काही लागत नव्हता. पोलीस अधीक्षक सचिन पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत खांडवी, उपअधीक्षक पुष्कराज सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली वडनेर खा. पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देवेंद्र शिंदे व स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील व त्यांचे सहकारी पोलीस कर्मचारी जिद्दीने रात्रं-दिवस तपास करत होते. या घटनेला दोन महिने उलटून गेले तरी पंकजचा मारेकरी हाती लागत नव्हता. पोलीस मात्र तपास करतच होते. एकेकाला संशयित म्हणून पोलीस ठाण्यात आणून ते चौकशी करत होते. मात्र कोणीही ताकास तूर लागू देत नव्हता. गुन्ह्याचा छडा लागत नसल्याने पोलीस तणावात होते. आरोपींना त्वरीत पकडा यासाठी शिष्टमंडळे वरीष्ठ अधिकाऱ्यांना जावून भेटत होती. मारेकरी निश्चित सापडतील असा विश्वास पोलीस अधिकारी बोलून दाखवत होते. पोलीस अधीक्षक सचिन पाटील वेळोवेळी फोन करून सहाय्यक पोलीस निरीक्षक देवेंद्र शिंदे आणि संदीप पाटील यांच्याकडून प्रगतीचा अहवाल घेत होते.. पोलिसांनी पुन्हा एकदा दाभाडी गावात जावून पंकज मानकरविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली. घटनास्थळापासून काही अंतरावर पंकजच्या मालकीची मालवाहू गाडी मिळून आली होती आणि घटनेच्या दिवशी दुपारी दाभाडी गावातून पंकज हा आपली गाडी घेवून अनंगमार्ग गेला असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली, त्यानुसार पोलिसांनी दाभाडी गावासह मार्गावरील दाभाडी ते अनंग रोडवरील सी. सी. टी. व्ही. कॅमेऱ्यांची पडताळणी केली. या सीसीटीव्ही फुटेजमध्ये काळ्या रंगाच्या दुचाकीवरून एक तरूण पंकज मानकर याच्या मालवाहू गाडीचा पाठलाग करत असल्याचे निदर्शनास आले, मात्र ठोस दिशा मिळत नव्हती. मिळालेले फुटेज अस्पष्ट होते. पोलिसांनी मात्र हार मानली नाही.ते फुटेज आणि कॉल रेकॉर्डीग वगैरे तांत्रिक बाबीची पडताळणी करून पोलिसांनी एका तरूणावर लक्ष केंद्रीत केले. शुभम उर्फ बबलू सुरेश पवार (वय २४), रा. जवाहरनगर, दाभाडी, ता. मालेगाव याला ताब्यात घेतले आणि त्याच्याकडे चौकशी सुरू केली, मात्र शुभम उर्फ बबलू मोठा बहादूर व चलाख होता. सतत तीन दिवस रात्र त्याच्याकडे चौकशी करूनही तो गुन्ह्याची कबुली देत नव्हता. वेगवेगळ्या क्ल्युप्त्या वापरून ते त्याला बोलते करण्याचा प्रयत्न करत होते. प्रश्नांचा भडीमार, तर कधी विश्वासात घेवून आदी प्रयोग केल्यावर अखेर तिसऱ्या दिवशी तो गडबडला आणि त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांच्या प्रयत्नाला यश आले होते.. पंकजचा खून करण्यापूर्वी म्हणजे सात-आठ दिवसांपूर्वी पंकज आणि शुभममध्ये मांडण झाले होते. पंकजने शुभमच्या गाडीला कट मारला होता. त्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला होता. त्यावेळी पंकजने शुभमला: आई-बहीणीवरून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली होती. त्याचा राग शुभमच्या मनात होता, तेंव्हापासून त्याचा कायमचा काटा काढण्याचा निर्धार त्याने केला होता. शनिवार दि. २१ मे २०२२ रोजी शुभमने पकजला भाडे आहे असे सांगून बोलावून घेतले. त्यानंतर त्याला गरबड गावाच्या शिवारात निर्जनस्थळी आणून त्याने पंकजच्या डोक्यावर व अंगावर कुल्हाडीने वार करून त्याला ठार मारले. त्यानंतर त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी त्याने मृतक पंकजला घसटत बोरी नदीच्या पात्रात आणले. त्याच्याच शटनि अडकवून त्याचे हात बांधून तो मृतदेह तिथेच टाकला अशी कबुली शुभमने दिल्यानंतर पोलिसांनी शुभम उर्फ बबलू सुरेश पवार याला या गुन्ह्यात अटक केली. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक देवेंद्र शिंदे, संदीप पाटील (स्थानिक गुन्हे शाखा), उपनिरीक्षक अशोक सुर्यवंशी, हवालदार शरद कुवर, पोलीस नाईक विजय वाघ, कॉन्स्टेबल गोकुळ शिलावट यांनी केला.

17 TO 23 OCTOBER 2022 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 10/15/2022 9:59 PM Page 1



## थोडक्यात वृत्तांत

### नुकसान झाल्यास विमा कंपनीस कळवावे!

लातूर : जिल्हयामध्ये मागील काही दिवसापासुन सर्वदुर पाऊस होत आहे. सध्या खरीप पिकांची काढणी अंतिम टप्यात असुन काही पिके शेतात उभी आहेत. काही शेतकऱ्यांनी काढणी केलेले पिके वाळवण्यासाठी शेतामध्ये तसेच ठेवलेले आहेत. अशा अधिसुचित पिकांचे गारपीठ, चक्री वादळ, चक्रीवादळामूळे पडलेला पाऊस व अवकाळी पाऊस यापैकी कोणत्याही बाबीमूळे पिक कापणी करुन सुकवणीसाठी ठेवलेल्या पिकांचे नुकसान झाल्यास वैयक्तीक स्तरावर पंचनामे करुन नुकसान भरपाई दिली जाते. यासाठी शेतकऱ्यांनी सदरची घटना घडल्यापासुन ७२ तासाच्या आत नुकसानीची सुचना सर्व प्रथम प्राधान्याने क्रॉप इंन्शुरन्स (Crop Insurance) मोबाईल पद्वारे देण्यात यावी. जेणेकरुन शेतकऱ्यांना व्यक्तीशः अर्ज, कागदपत्रे द्यावे लागणार नाहीत व कार्यालया समोरील संभाव्य गर्दी होणार नाही. पद्वारे दिलेल्या अर्जाची पूष्टी करुन संबंधीत शेतकऱ्यांना मोबाईलद्वारे डॉकेट आय.डी. मिळेल ज्याद्वारे शेतकऱ्यांना अर्जाची सद्यस्थिती पद्वारेच पाहता येईल. मोबाईल पद्वारे शक्य न झाल्यास भारतीय कृषि विमा कंपनीच्या तालुका स्तरावर कार्यन्वित असलेल्या तालुका विमा कार्यालयात देखील पूर्वसूचना देता येईल. क्रॉप इंन्शुरन्स (Crop Insurance) मोबाईल प गुगल प्ले स्टोअर (Google Play Store) वर उपलब्ध असून मराठी भाषेमध्ये माहिती भरता येणे शक्य असल्याने ज्या शेतकऱ्यांचे काढणीपश्चात नुकसान झालेले आहे त्यांनी प्राधान्याने पद्वारे नुकसानीची सूचना नोंदवावी व अधिक माहितीसाठी विमा कंपनी प्रतिनिधी, तालूका कृषि अधिकारी यांचेकडे संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

### काँग्रेस कार्यकर्त्याचा भाजपात प्रवेश

लातूर : लातूर तालुक्यातील एकुर्गा जिल्हा परिषद गटातील मौजे बोपला येथील काँग्रेस पक्षाचे धडाडीचे युवा कार्यकर्ते रोहित पाटील व त्यांच्या असंख्य सहकार्यानी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. विकास पुरुष देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब आणि राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या कामावर प्रेरित होऊन रोहित पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आ. रमेशअप्पा कराड यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केल्याने बोपला आणि त्या परिसरात काँग्रेसची ताकद कमजोर झाली आहे. याप्रसंगी भाजयुमोचे तालुका अध्यक्ष ॲड. धनराज शिंदे, माजी पंचायत समिती सदस्य ज्ञानेश्र्वर जुगल, युवा मोर्चा उपाध्यक्ष प्रशांत शिंदे, बालाजी गवळी, शंकर चव्हाण, रवि मगर उपस्थित होते. भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रवेश कार्यक्रमात रोहित पाटील यांच्यासह संतोष मगर ,ऋषी काटे, अनिल मिरजे, संभाजी मगर, गणेश मगर ,सुदीप पाटील, सुरज मगर, विकास पुदाले, लखन चव्हाण, श्रीकांत मगर, अमोल मगर, अमर इंगळे, दीपक गोरडे, कृष्णा काटे, श्याम कुंभार, आबासाहेब घुले, सुनील पाटील, शुभम पाटील, अक्षय गायकवाड, आकाश पाटील यांनी जाहीर प्रवेश केला.

### संघटनेच्या उदगीर ता.अध्यक्षपदी लखन कांबळे

लातूर : दक्ष कामगार संघटनेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात संघटनेच्या उदगीर ता.अध्यक्षपदी लखन कांबळे तर शिरूर अनंतपाळ तालुका उपाध्यक्षपदी उमाकांत कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सोहम गायकवाड, ॲड.संजय हाणमंत काळे, ॲड.तिरूपती नागरगोजे यांच्या हस्ते नियुक्ती प्रमाणपत्र देण्यात आले.याप्रसंगी बोलताना ॲड.काळे म्हणाले की, दक्ष कामगार संघटनेच्या माध्यमातून कामगारांना कायदेशीर न्याय मिळवून देणार असुन , त्यांना संविधनाने बहाल केलेल सर्व हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न दक्ष कामगार संघटनेच्या माध्यमातून करणार आहे. संस्थापक अध्यक्ष सोहम गायकवाड म्हणाले की, दक्ष कामगार संघटना ही कामगाराची हित व हक्कासाठी लढणारी संघटना आहे .तसेच यातील कामगारानां विविध मार्गाने लढा उभारून त्यांची आर्थिक उन्नती करण्याचा आमचा मानस आहे. या कार्यक्रमास शहर अध्यक्ष किरण बनसोडे, प्रकाश खराडे, प्रा.धम्मानंद सरवदे, बसवेश्वरआप्पा रेकुळगे, लक्ष्मण वाघमारे,सोमनाथ अर्जुने व इतर कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

### मुरलीधरराव देशपांडे यांचे निधन

अहमदपूर : तालुक्यातील काजळ हिप्परगा येथील जेष्ठ नागरीक तथा सेवानिवृत्त शिक्षक मुरलीधराव देविदासराव देशपांडे वय वर्ष ८२ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर मुंबई येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यात किनगाव व अंधोरी येथे माध्यमिक शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रोफेसर डॉ.प्रशांत देशपांडे यांचे ते वडील होते. लातूर येथील तरूण भारत संवादाचे पत्रकार संजय देशपांडे यांचे ते काका होत.

# शेतकऱ्यांना गुलामगिरीतून अन् त्यावर लादलेल्या गुन्हेगारीतून शेतकऱ्यांना मुक्त करावे लागेल -धनंजय पाटील काकडे



**यवतमाळ/प्रतिनिधी**

यवतमाळ येथील विश्रामगृहात दिनांक १४ ऑक्टोबर २०२२ ला बळीराजा पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री महेंद्र धावडे साहेब, तसेच बळीराजा पार्टीचे नव नियुक्त राज्य अध्यक्ष बाळासाहेब रासते यांच्यासोबत श्री धनंजय पाटील काकडे, कार्याध्यक्ष- शेतकरी संघटना समन्वय राज्य समिती. यांची शेतकऱ्यांच्या आत्महत्या व शेतकऱ्यांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी, चर्चा करण्यात आली. तसेच या चर्चेत सहभागी होताना श्री धनंजय पाटील काकडे म्हणाले, शेतकरी हा शेतीमाल पिकवतो परंतु त्याला भाव मागण्याचा अधिकार नाही. आणि त्याने शेतीमालाला भाव मागितला, त्यासाठी आंदोलने केली तर तोच शेतकरी वर्ग, शासनाच्या नजरेत आणि कायद्याच्या चाकोरीत गुन्हेगार ठरतो. त्याच्यावर गोळीबार सुरगाणा व कोर्ट केसेस दाखल होतात, त्यासाठी त्याला कैदेत सुध्दा राहावे लागते, उत्पादकांनी आपल्या शेतीमालाचा भाव ठरवू नये ही कुटील नीती या देशात वापरल्या जात आहे. या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या लाखो आत्महत्या वाढल्या. तर आता शेतकऱ्याला गुलामगिरीतून व गुन्हेगारीतून बाहेर काढण्यासाठी जे राजकीय व सामाजिक संघटना पक्ष शेतकरी संघटना समन्वय समितीच्या सोबत राहतील त्यांना आम्ही सहकार्य करू. हे शासनाच्या डोळ्यातील कुसळ काढण्यासाठी शेतकरी संघटना समन्वय समिती राजकीय व सामाजिक क्षेत्रातील संघटनांची एकत्र मोट बांधून पुढील निवडणूक मिशन २०२४ लढवित आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील अनेक राजकीय पक्षांच्या भेटीसाठी चालू आहे. महाराष्ट्रातील विधानसभा मतदारसंघ २८८ व लोकसभा ४८ मतदारसंघातील निवडणुकीसाठी एकत्रपने लढविण्याची तयारी केली जात आहे. ही आर्थिक स्वातंत्र्याची लढाई लढताना जे राजकीय सामाजिक गट सोबत येतील त्यांना सोबत घेऊन, व ज्या राजकीय संघटना याला विरोध करतील, ते शेतकरी विरोधी समजून त्यांना बाजूला करून ही लढाई महाराष्ट्रात राबवीली जात आहे.

# देवणी शहरात भरधाव वेगात कारची पादचाऱ्याला पाठीमागून धडक

## कार चालकाविरुध्द गुन्हा दाखल

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी शहरातील देवणी-वलांडी राज्य मार्गावरील बुलढाणा बँक समोर पायी चालत जाणाऱ्याला भरधाव वेगाने कारने जोराची धडक देऊन पाय फ्रॅक्चर केला. या प्रकरणी कार चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती गुरुवार दि.१३ ऑक्टोबर रोजी अशी माहिती देवणी पोलीसांनी दिली.

याबाबत देवणी पोलीसांच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, दि.८ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास फिर्यादी हा निलंगा ते देवणी मेन रोडने बोरोळ चौकाकडे चालत जात असतांना बुलढाणा बँकेसमोर रोडवर असतांना पाठीमागुन लासोना चौकाकडुन बोरोळ चौकाकडे जाणारी लाल रंगाची कार क्र. एम.एच.२४ ए.एफ. ३८४६ चा चालक प्रशांत वलांडे राहणार देवणी यांनी आपले ताब्यातील कार हयगयीने व निष्काळजी पणाने भरधाव वेगात चालवुन फिर्यादीस पाठीमागुन जोराची धडक देवुन डावा पाय गुडघ्यातुन फॅक्चर करुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर २३३/२०२२ कलम २७९, ३३७, ३३८, ५०४, ५०६ भादवी प्रमाणे कार चालक प्रशांत वलांडे राहणार देवणी यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हेडकाँसटेबल विनायक कांबळे हे करीत आहेत.

# औसा येथे दिन वाचन प्रेरणा दिन साजरा!



**आलमला/प्रतिनिधी**

रामनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आलमला तालुका औसा येथे दिनांक १५ ऑक्टोबर २०२२ रोजी विद्यालयाच्या प्रांगणात भारताचे माजी राष्ट्रपती डॉक्टर अब्दुल एपीजे कलाम यांच्या जन्म दिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला सर्वप्रथम डॉक्टर अब्दुल एपीजे कलाम साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे पदाधिकारी श्री प्रभाकर कापसे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले व त्यानंतर पुस्तक प्रदर्शनाचे उद्धाटन ही विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ अनिता पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले या दिनी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या पुस्तकांचे वाचन करण्याचा संकल्प विद्यालयाने केला होता आणि असंख्य विद्यार्थ्यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तकप्रदर्शनास भेट दिली व अनेक पुस्तकांचे अवलोकन केले याप्रसंगी ग्रंथपाल श्री रामेश्वर सगर यांनी वाचन प्रेरणा दिनाची पूर्वतयारी केलेली होती त्यास विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पुस्तक प्रदर्शनास भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले.

# विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करताना काळजी घ्यावी -डी.बी.माने

## महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी कार्यशाळा



**लातूर/प्रतिनिधी**

महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान, समाजकार्य आणि व्यवसाय अभ्यासक्रमातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी आपला शिष्यवृत्ती अर्ज महाडीबीटी पोर्टलवर नोंदविताना योग्य काळजी घ्यावी असे प्रतिपादन भारत सरकार शिष्यवृत्ती लातूर विभागाचे विभाग प्रमुख डी.बी.माने यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या व्होकेशनल सभागृहामध्ये महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी कार्यशाळा संपन्न झाली यामध्ये ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड, वरिष्ठ लिपिक एस.व्ही. भोसले, तालुका समन्वयक ए.व्ही.मुळे, जी.एम.जोगदंडकर, शिष्यवृत्ती समिती समन्वयक तथा स्टाफ सचिव कॅप्टन डॉ.बी.एम.गोडबोले, प्रा.रवींद्र सुरवसे, डॉ.संजय गवई आणि प्रा.श्रीकांत माळी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना डी.बी.माने म्हणाले की, भारत सरकार मार्फत समाजातील गरीब, गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीच्या माध्यमातून अर्थसहाय्य केले जाते. त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक विकासासोबत व्यक्तिमत्व विकासासाठी सुद्धा केला पाहिजे असे ते म्हणाले. यावेळी तालुका समन्वयक ए.व्ही.मुळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम आपला मोबाईल क्रमांक आधार क्रमांकाशी जोडून घ्यावा, आधार कार्ड राष्ट्रीयकृत बँकेतील खात्याशी लिंक करून घ्यावे. यानंतरच शिष्यवृत्तीचा फॉर्म दिलेल्या तारखेपर्यंतच भरला पाहिजे आणि आधार कार्ड लिंक केलेला मोबाईल क्रमांक शैक्षणिक जीवन संपेपर्यंत आपण तो बदलू नये असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील लिपिक यशपाल ढोरमारे यांनी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना केलेल्या उत्कृष्ट सहकार्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.किसनाथ कुडके, प्रा.शिवशरण हावळे, प्रा.आशिष क्षिरसागर, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदर्गे, लिपिक यशपाल ढोरमारे, सय्यद जलील आणि बालाजी डावकरे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान, समाजकार्य आणि व्यवसाय अभ्यासक्रमातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय अपराध जांच ब्युरोचा नवरात्र उत्सवात बंदोबस्त



**लातूर/प्रतिनिधी**

शारदीय नवरात्र उत्सवात राष्ट्रीय अपराध जांच ब्युरो चे राष्ट्रीय संचालक सुरेशकुमार शुक्ला दिल्ली यांच्या आदेशानुसार तुळजाभवानी मंदिर आणि परिसरात पंधरा दिवस बंदोबस्त करण्याचे नियोजन करण्यात आले. तुळजाभवानी मंदिर प्रशासकीय कार्यालयात जनसंपर्क अधिकारी नागेश शितोळें यांनी महाराष्ट्र राज्य संचालक चंद्रशेखर धोत्रे यांचा सत्कार करून बंदोबस्ताला सुरुवात केली. भारतात यात्रा उत्सव काळात राष्ट्रीय अपराध जांच ब्युरो पोलीस प्रशासनाला मदत करण्याच्या उद्देशाने कायम सहकार्य करत असते.

ज्या ठिकाणी जास्त गर्दी होत होती त्या ठिकाणी गर्दी कमी करण्याचे काम व्यवस्थित पार पाडल्यामुळे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी आणि तत्कालीन जिल्हाधिकारी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे यांनी NCIB चे कौतुक केले, बंदोबस्त साठी उप विभागीय पोलीस अधिकारी सई भोर-पाटील यांनी बंदोबस्त चे नियोजन केले. तहसीलदार सौदागर तांदळे, पोलीस निरीक्षक आदिनाथ काशीद, तहसीलदार तथा व्यवस्थापक योगिता कोल्हे यांनी बंदोबस्तसाठी आलेल्या NCIB च्या सर्व अधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले. मुंबई, नवी मुंबई, नाशिक, पुणे, कोल्हापूर, लातूर उस्मानाबाद, महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून बंदोबस्तसाठी NCIB अधिकाऱ्यानी जबाबदारी पार पडली. राज्य संचालक चंद्रशेखर धोत्रे, राज्य जनसंपर्क अधिकारी संजय रोडे, लातूर अपराध सूचना अधिकारी शिरीषकुमार शेरखाने, लातूर अपराध सूचना अधिकारी बसवेश्वर पसारे, पुणे जिल्हा प्रतिनिधी संतोष जाधव, उस्मानाबाद अपराध सूचना अधिकारी संजयकुमार बोंदर, कोल्हापूर जिल्हा प्रतिनिधी अमोल पल्लखे, पुणे अपराध सूचना अधिकारी अनिल टपके, नवी मुंबई अपराध सूचना अधिकारी आनंद महाजन, पुणे अपराध सूचना अधिकारी विशाल दळवी, सदस्य नागरिक हक्क सुरक्षा परिषद मंजूनाथ कोपर्डे उपस्थित होते.

# किल्लारी येथील भूकंपामध्ये मृत्यू पावलेल्या नागरिकांना श्रद्धांजली!

लातूर : ३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या प्रलयकारी भूकंप झालेला आज या घटनेला २९ वर्ष पूर्ण झाली. पण आजही त्याच्या झळा औसा तालुक्यातील किल्लारी या गावाला जाणवताना दिसतात. ३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या प्रलयकारी भूकंपामध्ये मृत्यू पावलेल्या नागरिकांना किल्लारी येथील स्मृतिस्तंभास आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी., उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) नितीन वाघमारे, औसा रेणापूर उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, तहसीलदार भरत सूर्यवंशी, प्र.सरपंच युवराज गायकवाड , तहसीलदार भरत सूर्यवंशी, ग्रामसेवक तुकाराम बिराजदार , जिल्हा परिषद सदस्य सुभाष पवार , माजी सरपंच शंकरराव प्रसाद , कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती किशोर जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी , विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच ग्रामस्थांनी पुष्पचक्र अर्पण करून व दोन मिनिटे मौन पाळून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी पोलीस प्रशासनाच्यावतीने बंदुकीच्या गोळ्याच्या तीन फेरीने सलामी देण्यात आली.


**जिल्हा परिषद पालघर**
**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/११/२०२२ दिनांक : १२/१०/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर मौजे घिवली ता. पालघर येथे नवीन नळ पाणी पुरवठा योजना करणे. जि. पालघर या कामांसाठी Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक ०४/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक १०/१०/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
(जी.पी. निवडंगे)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद, पालघर


# संशयी वृत्तीतून पतीने पत्नीचा चिरला गळा आणि स्वतः केली आत्महत्या

**भंडारा/प्रतिनिधी**

आर्थिक टंचाई आणि संशयी वृत्तीतून पतीने पत्नीचा गळा चिरून खून केला. त्यानंतर स्वत:ही आत्महत्या केली. ही थरारक घटना तुमसर तालुक्यातील सीता सावंगी येथे शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. सुशील बोरकर (४६) असे पतीचे, तर सरिता बोरकर (४२) असे पत्नीचे नाव आहे. गोबरवाही पोलिस ठाणे हद्दीतील सीता सावंगी येथे सुशील बोरकर व सरिता बोरकर हे दांपत्य राहत होते. सुशील अंडी विक्रीचा व्यवसाय करायचा, तर सरिता आशा सेविका म्हणून काम करत होती. त्यांना एक मुलगी आणि एक मुलगा अशी अपत्ये आहेत. काही दिवसांपासून सुशील हा आर्थिक अडचणीत अडकला होता, अशी माहिती आहे. गुरुवारी रात्री सुशील, सरिता व त्यांची मुले झोपी गेली. मुले एका खोलीत तर दोघेही पती-पत्नी दुसऱ्या खोलीत होते. सकाळी ६.३० वाजेच्या सुमारास मुले जागी झाली. त्यांनी आईवडिलांना आवाज दिला, परंतु खोलीतून काहीही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे मुलांनी शेजारी राहणाऱ्या नातेवाइकांना बोलावले. नातेवाइकांनी येऊन त्यांना उठवण्याचा प्रयत्न केला तरीसुद्धा कुठलाही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी दरवाजा तोडला. तेव्हा खोलीतील दृश्य अत्यंत थरारक होते. दोघेही पती-पत्नी रक्ताच्या थारोळ्यात पडून होते. सरिता बिछान्यावर, तर सुशील खाली गळा चिरलेल्या अवस्थेत दिसून आला. लागलीच गोबरवाही पोलिसांना सूचना देण्यात आली. गोबरवाहीचे ठाणेदार दीपक पाटील यांनी ताफ्यासह धाव घेत तपासाला सुरुवात केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक लोहित मतानी व स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी भेट दिली. घटनास्थळी पोलिसांना ब्लेड आढळून आले. शिवाय खोलीतील दार आतून बंद होते. त्यामुळे बाहेरून कुणी व्यक्ती खोलीत येण्याची शक्यता नव्हती. वादानंतर उचलले टोकाचे पाऊल काही दिवसांपासून सुशील हा आर्थिक टंचाईत होता. त्यातच तो संशय घेत होता. गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास पती-पत्नीतील वाद विकोपाला गेला. त्यामुळे सुशीलने ब्लेडने सरिताचा गळा चिरला. प्रचंड रक्तस्राव झाल्याने



सरिताचा मृत्यू झाला. त्यानंतर सुशीलने स्वत:च्या गळ्यावर ब्लेडने वार करून आत्महत्या केली. सुशीलचे बोट ब्लेडने चिरलेले आढळून आले. याप्रकरणी गोबरवाही पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. अधिक तपास ठाणेदार दीपक पाटील करत आहेत.

17 TO 23 OCTOBER 2022 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 10/15/2022 10:00 PM Page 1



# महा विकास आघाडीचा पर्याय काळाची गरज!

भारतात आघाडीचे राजकारण नवीन नाही आणि जनता पक्षापासून त्याची सुरुवात झाली आहे. मात्र पाशवी बहुमताच्या जोरावर मनमानी करणाऱ्या पक्षाच्या विरोधात सर्व पक्षांनी एकत्र येऊन एक मजबूत आघाडी केली आणि ती टिकवली तर २०२४ चा लोकसभा आणि काही राज्यांच्या विधानसभा निवडणुकीसाठी तो एक सक्षम पर्याय ठरू शकतो. त्यामुळे महाराष्ट्रात अडीच वर्षापूर्वी झालेला महा विकास आघाडीचा प्रयोग देशाच्या राजकारणात धर्मनिरपेक्षतेचा आधारस्तंभ ठरू शकतो आणि हीच वस्तुस्थिती लक्षात ठेऊन भाजप विरोधी सर्व पक्षांनी एकत्र यायला हवे. कारण या देशात हिंदुत्वाच्या नावाखाली जे काही सुरू आहे ते देशाला दुसऱ्या फाळणी कडे नेणारे आहे. म्हणूनच भाजप समोर सर्व पक्षांचे महा विकास आघाडी सारखे एक मजबूत संघटन उभ राहायला हवं. सध्या देशातील आणि खास करून महाराष्ट्रातील जातीयवादाचे घाणेरडे राजकारण पाहता भाजप तसेच शिंदे गटा सारख्या फुटीर लोकांपासून महाराष्ट्राचे पुरोगामित्व आणि धर्म निरपेक्षता वाचवण्याची गरज आहे आणि म्हणूनच सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन वाटचाल करणाऱ्या महा विकास आघडीची गरज आहे. याबाबत उद्धव ठाकरे यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. कारण त्यांच्या पक्षाला इतके हादरे बसून सुद्धा त्यांनी काँग्रेस राष्ट्रवादीची साथ सोडली नाही आणि आज त्याचाच फायदा त्यांना अंधेरी पूर्व पोट निवडणुकीत झाला आहे. कारण या पोट निवडणुकीत शिवसेनेच्या पाठीशी काँग्रेस-राष्ट्रवादी भक्कमपणे उभी राहिली आहे. अंधेरीत मोठ्या प्रमाणावर उत्तर भारतीय दलीत आणि मुस्लिम बांधव राहतात त्यांना भाजपच्या जातीयवादी राजकारणाची भयंकर चीड आहे आणि असाही दलीत मुस्लिम मतदार चुकूनही भाजपला मतदान करणार नाही आणि सर्वात महत्वाचे म्हणजे या मतदार संघात दिवंगत रमेश लटके यांचे मोठे काम आहे. त्यामुळे ऋतुजा लटके यांचा विजय होणार हे सांगायला कुठल्याही ज्योतिषाची गरज नाही. पण या ठिकाणी महा विकास आघाडी म्हणून ज्या प्रकारे निवडणूक लढविण्यात आली तशीच आघाडी २०२४ पर्यंत टिकायला हवी. कारण महाराष्ट्रातील दलीत-मुस्लिम समाजाला याच आघाडीचा आधार वाटतोय. त्यामुळे मुंबईतील समजदार महाराष्ट्रावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक मराठी माणसाने उद्धव ठाकरे आणि शिवसेना पक्षचा पाठीशी उभे राहायला हवे. शिवसेनेच्या पाठीशी असलेला मराठी माणूस आणि दलीत-मुस्लिमांची ताकत या दोनच गोष्टी मुंबई महाराष्ट्राला वाचवू शकतात आणि केंद्रात जे गुजराती-मारवाडी बसले आहेत त्यांना महाराष्ट्राचे तुकडे पडायचे आहेत. मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करायची आहे आणि त्यांचे जर मनसुबे हाणून पाडायचा असतील तर महाराष्ट्रात शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांनी एकत्र रहायलाच हवे. मुंबई महापालिकेवर या लोकांचा डोळा आहे. पण मुंबईकर वेडा नाही. मुंबईकर जनतेला जाती धर्माचे राजकारण अजिबात मान्य नाही आणि आता तर ज्या पद्धतीने देशात दलीत मुस्लिमांना त्रास दिला जातोय, त्यामुळे या देशातील दलीत-मुस्लिम चिडलेला आहे आणि त्याला आपल्या अस्तित्वाची लढाई लढायची आहे आणि म्हणूनच सर्वधर्म समावेशक असलेले काँग्रेस राष्ट्रवादी हे पक्ष टिकायला हवेत. त्यांना शिवसेनेची अशीच साथ मिळायला हवी. तरच या मुंबईतील दलीत-मुस्लिम कष्टकरी या महाराष्ट्रात सुखा समाधानाने राहील. तसे पाहता प्रत्येक पक्षाची एक स्वतःची अशी भूमिका असते. त्यानुसार त्या पक्षाचे काम सुरू असते. पण कधी कधी अशी वेळ येते की पक्षाची धेय धोरणे बाजूला ठेऊन देशासाठी, समाजासाठी काही तडजोडी कराव्या लागतात. २०१४ पासून देशातील परिस्थिती बिघडलेली आहे. देशात धर्म आणि जातीच्या राजकारणाने देशात विद्वेशाचे वातावरण तयार केलेले आहे. त्यातून तरुण वर्गाला जातीयवादी बनवले जातेय. त्याच्या मनात कट्टर धार्मिक भावना रूजवल्या जात आहेत. त्याला त्याच्या धर्माच्या विषयी अधिक कट्टर बनवले जाते आहे आणि त्यातून एक जहाल हिंदू नागरिक बनवण्याचे काम सुरू आहे. आणि यात यश आले की या देशाला हिंदुराष्ट्र बनवण्याचा हेतू साध्य करता येईल. पण तसे झाले तर या देशातील २२ कोटी मुसलमान तसेच दलीत, सीख, ख्रिश्चन यांचे काय होणार? कुठल्याही देशात अल्पसंख्यांकांचे काय होते ते पाकिस्तान आणि बांगला देशात आपण पाहतोय. मग तशीच परिस्थिती भारतात निर्माण करायची आहे का? आणि म्हणूनच भाजप सारख्या पक्षाच्या विरोधात महाविकास आघाडी सारखी एक मजबूत आघाडी उभी राहणे गरजेचे आहे.

# हायब्रीड दहशतवादी म्हणजे कोण?

## दिशायन

जम्मू काश्मीर परिसरात गेल्या दोन वर्षापासून हायब्रीड दहशतवाद्यांचा सुळसुळाट झाला आहे. त्यांनी केलेल्या हत्याकांडामुळे स्थानिक प्रशासनाची झोप उडाली होती. या दहशतवाद्यांना जेरबंद करण्यासाठी नुकतीच पोलीस आणि जवानांनी मिळून एक मोहिम राबवली, ज्यात एक हायब्रीड दहशतवादी आणि काही स्फोटके सापडली आहेत. तर, यानिमित्ताने पुन्हा एकदा हायब्रीड दहशतवादी हा मुद्दा चर्चेत आला आहे, याविषयी अधिक माहिती आपण लेखातून जाणून घेऊयात.

जम्मू काश्मीर पोलीस, ४४ राष्ट्रीय रायफल बटालियन आणि सीआरपीफच्या जवानांनी काही दिवसांपूर्वी राबवलेल्या एका संयुक्त मोहीमेत हेफखुरी मलदारा येथे एका हायब्रीड दशतवाद्याला पकडण्यात आले. यावर अहमद असे त्याचे नाव असून त्याच्याकडून एक ९ एमएम पिस्तुल, १२ राउंड आणि एक मॅगझिन जप्त करण्यात आले आहे. तो शोपियांच्या हेफ झैनपोरा येथील रहिवासी आहे. सध्या अहमदची चौकशी सुरु आहे, याच्या माध्यमातून आणखी हायब्रीड दहशतवादी, यांचा म्होरक्या, यांची ठिकाणे यांपर्यंत पोहोचता येऊ शकते.

हायब्रीड दहशतवाी म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती या सामान्य नागरिकांप्रमाणे जीवन जगत असतात. त्यांची कोणतीही गुन्हे नोंद, दहशतवादी संघटनांशी संबंध असल्याचे नोंद नसते. त्यांची प्रतिमा स्वच्छ असते, अशा व्यक्ती दहशतवादी हल्ले घडवण्याचे कार्य करतात. ते केवळ हल्ला करण्यापुरते ॲक्टीव्ह होतात आणि नंतर आपल्या सामान्य आयुष्यात परतात. अशावेळी या दहशतवाद्यांना शोधणे खूप कठीण होऊन बसते. हा स्लीपरसेल सारखाच प्रकार आहे. स्लीपरसेल वर अनेक सिनेमे आलेले आहेत, त्यामुळे हा प्रकार जनतेला माहिती आहे. याच्याशीच साधर्म्य साधरणार हायब्रीड दहशतवादी हा प्रकार आहे.

काश्मीरमधील सुरक्षा दल आणि गुप्तचर संस्थानी त्यांचे वर्णन 'बॉईज नेक्स्ट डोअर' असे केले आहे. ते सामान्य जीवन जगत असले तरी ते स्टँडबाय मोडवर असतात, हल्लाच्या वेळी ते प्रत्यक्षात समोर येऊन काम करतात. काश्मीरमध्ये मागील २ वर्षापासून झालेल्या ५५ नागरिकांच्या हत्यांपैकी ७० टक्क्यांहून अधिक घटनांसाठी पोलिसांनी या हायब्रीड दहशतवाद्यांना जबाबदार ठरवले आहे. जम्मू आणि काश्मीरचे पोलीस महासंचालक दिलबाग सिंग यांनी सांगितले की, आमच्याकडे हायब्रीड दहशतवादी आहेत, ज्यांच्या नावाची दहशतवादाशी संबंधित घटनांमध्ये फारशी नोंद नाही. ते त्यांच्या पहिल्या कामगिरीनंतर दहशतवादी बनतात.

७ ऑक्टोबर २०२१ रोजी श्रीनगरमध्ये एका सरकारी शाळेत द रेसिस्टेंस फ्रंटशी निगडीत असणाऱ्या संशयित दहशतवाद्यांनी दोन गैरमुस्लिम शिक्षकांची हत्या केली होती. या हत्याकांड प्रकरणात पहिल्यांदा हायब्रीड दहशतवादी हा शब्द वापरला गेला, त्यानंतर तो सर्वत्र प्रचलित झाला. या हायब्रीड दहशतवाद्यांचे उद्दीष्ट दहशत पसरवणे हा आहे. त्याचबरोबर, स्थानिक इकोसिस्टमला लक्ष्य करणारे व्यवसाय उभारणे अर्थात दहशत पसरवण्यास सहाय्य करणारे आणि सामाजिक कार्य थांबवणे. यामुळे त्या प्रदेशाची प्रगती खुंटेल आणि दहशतवाद फोफावत राहील. म्हणूनच फुटीरतावादी, हिंसाचारी आणि भडकावणाऱ्यांच्या विरोधात उठणारा आवाज ते बंद करतात, त्यांना मारतात जेणेकरून कोणी ही परिस्थिती बदलण्याचा विचारच करू नये. हायब्रीड दहशतवादी घडवण्यासाठी सर्वात अगोदर त्यांचे ब्रेनवॉश केले जाते. धर्म आणि द्वेषाच्या नावावर त्यांना काहीही करण्यासाठी तयार केले जाते. त्यानंतर त्यांना गुप्तरित्या शस्त्र चालवण्याचे प्रशिक्षणही दिले जाते. यामध्ये बहुतांश प्रमाणात युवकांचा समावेश असतो, ज्यांना कट्टर बनवले जाते. पुढे त्यांना सामान्य जीवनात जाऊन व्यवसाय, नोकरी करण्यास सांगितले जाते, त्यासाठी त्यांना सहाय्य केले जाते. ते एक पॉईट ऑफ कॉन्टॅक्ट डेव्हल्प करतात, त्याच्याकडून हल्ला कधी, कसा, करायचा ते समजते. त्यानुसार हायब्रीड दहशतवादी आपल्या सामान्य जीवनातून सुट्टी घेतो आणि हल्ला करून पुन्हा सामान्य जीवनातून जातो. अशा हायब्रीड दहशतवाद्यांना सर्व सुरक्षा यंत्रणांच्या नाकी नऊ आणले आहेत, परंतु यांना शोधण्यासाठी नव नवीन मोहिमा आखल्या जात आहेत.



# जाती-धर्माचे प्रदर्शन की, आर्थिक धोरणाचे नियोजन

दसऱ्याच्या मुहूर्तावर महाराष्ट्रात सहा ठिकाणी लाखो लोकांचे मेळावे व इतर कार्यक्रम झाले.शिंदेचा व उद्धवचा मुंबईत झाला , पंकजाताईचा भगवानगड, प्रकाश आंबेडकरचा अकोला, आर.एस.एस.चा विजयादशमी मेळावा नागपूर, अमरावती. बौद्ध धर्मीयांचा कार्यक्रम दीक्षाभूमीवर नागपूरला झाला. (राजकीय नेते व धार्मिक भंतेजी उपस्थित असतात आणि बौद्ध धर्मीयांमध्ये सुद्धा शेतकरी व शेतमजुर वर्ग आहे.) संपूर्ण महाराष्ट्रातील एकाही मेळाव्यात शेतकऱ्यांचे, शेतमजुरांच्या आर्थिक धोरणावर, शेतमालाच्या भाव वाढीवर, व शेतकरी आत्महत्तेवर भूमिका स्पष्ट झाली नाही. व एकही मेळाव्याने ठोस निर्णय घेतले नाहीत. एवढ्या नैसर्गिक संकटात, भीषण पाण्याच्या संकटात शेतकरी समाज असताना सुद्धा, जाहीरपणे चिंता व्यक्त केली नाही. लुटलेल्या तिजोऱ्यांचा झगमगाट मात्र मेळाव्यात प्रकर्षाने दिसत होता.



मग शेतकऱ्यांची, शेतमजुरांची निवडणुकीत मते घ्यायची,आणि त्यांचेच नाव घेऊन तीच मते त्यांनाच डुबविण्यासाठी वापरायची काय? निवडणुकीत ज्याने त्याने स्टेजवर यावे शेतकऱ्यांचे नाव घ्यावे, त्यांच्या, दुःखाच्या वेदना सांगाव्या , अन् त्यांच्याच पाठीत खंजीर खुपसावा, अशी निती जगात तरी पाहायला मिळेल काय? या कार्यक्रमासाठी लोकसमूह फक्त जाती- धर्मा च्या नावावर जमा केला होता असेच चित्र डोळ्यासमोर समाजाला दिसले?. मुस्लिमांचे व इतर धर्माचे सुद्धा मेळावे आपापल्या जाती व्यवस्थेवर आधारितच असतात. व त्यातूनच नेते आपली राजकीय पोळी शिजवून घेतात.हीच राजकीय नेते मंडळी, आपापल्या पक्षासाठी आर्थिक धोरणावर एकही मेळावा का घेत नाही ? जाती-धर्माचे नाव घेऊन राजकारणाचे व्यवहार अतिशय सोपे जातात आणि सुरळीत होतात? या जाती धर्माच्या शक्तिप्रदर्शनात, तुम्ही सर्व तरुण आतापर्यंत संपून गेले, व बेरोजगारीचे प्रश्न निर्माण करून हाती धूपारणेआले आणि त्यासाठीच तुमचा पद्धतशीरपणे उपयोग केला जात आहे. हे अजूनही तरुणांच्या लक्षात आले नाही कां ?. जाती धर्माच्या नावावर द्वेष पसरण्यासाठी तरुणांची माथी भडकविल्या जातात. जाती धर्माचे झेंडे हाती घ्या आणि या देशात विध्वस उभा करा हीच शिकवण त्यातून दिल्या जात आहे ना ?. जय भवानी, जय शिवाजी, व जय भीम म्हटल्याने पोटाची आग शांत होणार आहे काय ?यामध्ये तरुणाईचा थोडाफार आनंद द्विगुनीत होऊ शकतो, पण त्यातून तर शासन तिजोरी लुटणाऱ्यांची फौज तयार झाली आहे ना?. आणि आता ईडीच्या धाकाने सत्तांतरे होतं आहे.

ज्यांना या देशाची धोरणे कळत नाही व जाती धर्माच्या नावावर उडतात, त्यांच्या हाती शासनाची तिजोरी समाजानेच जर दिली आहे तर ते तिजोरी चोर बनणार नाहीत काय? आणि आजचा बिनडोक तरुण जाती धर्माच्या नावावर उदो उदो करतो आहे, त्याला त्याच्या कुटुंबाची व स्वतःची फजिती कळत नाही, तर तो देशाची काळजी करायला निघाला आहे .

भारत जोडो यात्रेत, कोणीही शेतमालाच्या निर्यात बंदी वर बोलत नाही. आणि शेतकऱ्यांनी पिकवलेल्या मालाचे महागाई च्या नावाने प्रदर्शनी करतात. सत्तेतील पक्षांनी फक्त शेतकऱ्यांने उत्पन्न वाढवावे व शहरातील लोकांना पोसावे , आणि जमा झालेली तिजोरी शहरी विकासाच्या नावावर खर्ची घालावी हीच मालिका आतापर्यंत चालू ठेवली. बीजेपी ने सुद्धा देशात शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या महागाईचे च प्रदर्शन आजपर्यंत केले व मते मिळवली. काँग्रेस व बीजेपी हे दोन्ही राजकीय पक्ष शेतमालाच्या आर्थिक धोरणावर, शेतमालाच्या निर्यात बंदी वर निर्णय घेतील का? हा मोठा गंभीर प्रश्न आज सर्वांना भेडसावीत आहे?.

गेल्या ७५ वर्षात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्थशास्त्रीय धोरणावर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेवर , महात्मा फुले नी सांगितलेल्या गुलामगिरीवर , संत तुकारामांनी सावकारी कर्जाच्या वह्या इंद्रायणी नदीत डुबवून कर्जमुक्त धोरणावर , शिवाजी महाराजांच्या आर्थिक धोरणावर हे राजकीय पक्ष का मेळावे घेत नाहीत ?. त्यांच्या जाती व्यवस्थेवर का घेतात? या संत महतांनी जाती द्वेषापेक्षा तर आर्थिक धोरणे संपूर्ण आयुष्यात समाजाला समजाऊन सांगितली . त्यांनी सांगितलेली आर्थिक धोरणे बाजूला ठेवायची आणि त्यांच्या जातीच्या नावाचा उद्रेक करायचा, व गावच्या गाव व संपूर्ण शहरे कामी लावायची. हा मनाला वाटणारा सुंदर पण प्रत्यक्षात मात्र चिल्लर खेळ राजनीतित वापरला गेला. आर्थिक धोरणावर मेळावे घेऊन, स्व. शरद जोशींनी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून समाजात केलेली जन - जागृती ही अनमोल आहे. आतापर्यंत आर्थिक धोरणावर फक्त शेतकरी संघटनेनीच लाखो लोकांचे मेळावे घेतले, असल्याची इतिहासात नोंद आहे. ते मेळावे कोणत्याही जातीपंथाचे नव्हते,जगण्यासाठी जातीच्या व्यवस्थेपेक्षा, आर्थिक धोरणाची आवश्यकता आहे ना? खऱ्या अर्थाने समाजाला दिशा देणारी व्यवस्था होती ना ? मग त्यावर तरुणांनी मते का टाकली नाहीत ? आतापर्यंत जर निवडणुका या आर्थिक धोरणावर झाल्या असत्या तर या देशाला शेतकरी आत्महत्येचा कलंक लागला नसता?.

मग या देशाच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या लढाईसाठी युवक-युवती पुढे येण्यासाठी विचार करणारआहे की नाही ?, त्यांच्या मायबापाच्या आत्महत्या वाचवायच्या असतील, तर आजच्या तरुणांना आता पुढे यावेच लागेल, व आर्थिक धोरणाच्या पक्षांनाच मतदान करावे लागेल. तरच भारत देश अबादीत राहील, व जाती-धर्मा च्या विळख्यातून बाहेर पडेल. हेच नेते जाती धर्माची तेढ वाढवितात, आणि संघर्ष पेटला तर शहर बंदी, नाकाबंदी, कर्फ्यू ची कलमे लावतात. आतापर्यतच्या सर्वच धर्माच्या समुदायाने आपापल्या जातीचे , आमदार, खासदार, मंत्री सत्तेत पाठविले, परंतु नियोजना अभावी कोणीही शेतकरी आत्महत्या रोखू शकले नाही. आणि त्यांना त्या रोखाच्य सुद्धा नाहीत. जेव्हा देशातील शेतकऱ्यांच्या शेतीमालावर निर्यात बंदी उठवीली जाईल तरच आर्थिक प्रगती झाल्या शिवाय राहणार नाही?

तर उठा आता तरुणांनो, तुम्ही आर्थिक स्वातंत्र्याच्या व्यवस्थेवर जगणार की, जाती धर्माच्या नावावर जगणार आहात? याचे तुम्हाला चिंतन व मनन करावेच लागेल. काँग्रेस, राष्ट्रवादी, सेना, बीजेपी हे सर्व राजकीय पक्ष डोक्यातून हाकला? , देशांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर आणि शेतकरी, शेतमजुर विरोधी कायदे नष्ट करण्यासाठी, आता जे राजकीय पक्ष काम करत असतील त्यांनाच निवडून आणावे लागेल.

शेतकरी संघटना ही शेतकऱ्यांची आणि शेतमजुरांच्या धोरणावर गेल्या ४० वर्षापासून सतत आंदोलने मेळावे घेऊन जनजागृती करीत आहे. आता हा प्रश्न राज्य पातळीवर आणि केंद्र पातळीवरील आर्थिक धोरणाच्या कायद्यात अडकलेला आहे.संविधानात केलेल्या चुकीच्या दुरुस्तीत फसलेला आहे. १८ जून १९५१ ला काँग्रेस राजनीतीने शेतकरी, शेतमजुराचा घात करून शेतकरी विरोधी कायदे तयार केले ते कायदे बदलण्याची जबाबदारी आता पुढील पिढीवर युवक, युवतीच्या पाठीवर आहे. ही चुकीची आर्थिक धोरणे राबविलेले कायदे नष्ट करण्यासाठी, तुम्हा तरुणांना आता स्वतंत्र फळी उभी करावी लागेल. आजचा राजकीय पक्ष एकही शेतकरी, शेतमजुरांच्या विरोधी असलेले कायदे नष्ट करायला तयार नाहीत? हे गेल्या ७५ वर्षाच्या धोरणातून आणि निवडणुकीच्या माध्यमातून स्पष्ट झाले आहे. व तसे समाजालाच व्यवस्थित दिसून सुध्दा आले आहे.

शेतकरी, शेतमजूर हा रात्रंदिवस कष्ट करून शेतीचे नियोजनातून पैसा उपलब्ध करतो व त्याच आर्थिक धोरणावर देश चालतो, आणि जो खऱ्या अर्थाने देशाची सेवा करतो त्यालाच मातीत घालण्याचे कायदे या देशात तयार झाले, तर तो स्वतंत्र कसा होईल?. शेतकरी व शेतमजूर स्वतंत्र होऊ नये ही राजकीय पक्षांनी बांधलेली खून गाठ आहे.आजही शेतकऱ्याने शेतीमालाचा भाव मागितला तर,त्याला गुन्हेगार समजल्या जाते? . त्यावर अश्रुधुराच्या नळकां ड्या ,लाठीमार व त्याला कैदेत डांबून ठेवल्या जाते, कोर्ट केसेस दाखल केल्या जातात, म्हणजेच तू शेतीमाल पिकवावा, व देशाला पोसण्याची जबाबदारी त्याच्या डोक्यावर ठेवावी, पण तो शेती मालाला भाव मागत असेल, तर तो शेतकरी गुन्हेगार आहे?

शासन त्याला अन्नदाता म्हणते, बळीराजा म्हणते व जगाचा पोशिंदा म्हणते, आणि त्याच्याच डोक्यावर नाचून त्याचे पोटातील आतडे बाहेर काढते, या शेतकरी विरोधी धोरणाच्या गुलामीत फसलेला हा शेतकरी गुन्हेगार आहे तर तो तुम्हाला मुक्त करायचा नाही का? आणि आपल्या शेतकरी, शेतमजूर बापाला मुक्त करायचे असेल ,तर आता फक्त तुमच्यासाठी एकच पर्याय आहे?आर्थिक धोरणावर काम करणारी, व्यवस्था म्हणजेच...

शेतकरी संघटना समन्वय समितीला सहकार्य करावे लागेल? तरच तुमच्या तरुणांचे भवितव्य उज्वल होईल ? अन्यथा शहरीकरणाच्या गटांगळ्यामध्ये तुम्ही आजन्म फसल्या शिवाय राहणार नाही. या धार्मिक व जातीच्या व्यवस्थेतून बाहेर काढण्यासाठी एकमेव शाहू, फुले, आंबेडकरांचा विचारच फक्त तुम्हाला तारणारा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी लिहिलेली ग्रामगीता ही आर्थिक धोरणावर आहे, परंतु तिचा उपयोग फक्त संस्कारी जीवन जगणे व आचरणावर जास्त भर ग्रामगीताचार्यांनी दिला आहे. तरी आता पुढे ग्रामगीतेतील आर्थिक धोरनाची शिकवण समाजाला द्यावी लागेल . वारकरी संप्रदाय पंढरीची वारी करत असताना शेतात बियाणे फेकून विठुरायाला साकडे घालत असतात. विठुराया या वर्षी भरपूर पिकू दे व शेतकऱ्याच्याघरात सुख, समृद्धी नांदू दे.

आषाढी व कार्तिक एकादशीला पंढरपूरला दरवर्षी येऊन मुख्यमंत्री पारंपारिक पूजाअर्चा करतात, पण एकाही मुख्यमंत्र्यांनी शेतकरी,शेतमजुराच्या विरोधातील कायदे नष्ट करण्यासाठी किंवा दुरुस्त करण्यासाठी राज्य सरकारने, केंद्र सरकारला भाग पाडले नाही. त्यांच्या पक्षाचे आमदार व खासदार सत्तेत असतात .दहा लाख वारकरी लोकांमध्ये फोटो सेशन करून फक्त प्रसिद्धी मिळविली जाते . अशा मुख्यमंत्र्याच्या फुकट्या पॉलिसीमुळे शेतकरी व शेतमजूर हा जागेवरच संपविण्याची कटकारस्थाने वापरलेली आहेत. अशी चुकीचे धोरणे बदलविण्याची, जबाबदारी आता सर्व समाजावर येऊन ठेपली आहे.



ना हिंदू खतरे मे है, ना बौद्ध, मुस्लिम खतरे मे है, बल्की इस देश का किसान,बेरोजगार और मजदूर खतरे मे है!

**लेखक : धनंजय पाटील काकडे,**
**कार्याध्यक्ष, शेतकरी संघटना समन्वय समिती,**
**महाराष्ट्र (९८९०३६८०५८)**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

17 TO 23 OCTOBER 2022 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 10/15/2022 10:01 PM Page 1



# अरे बापरे... डीपीसीच्या बैठकीत दिशाभूल करणारी माहिती

## चौकशी समितीकडे आलेली माहिती वेगळीच

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

'खोटं बोल पण रेटून बोल' अशी एक मराठीत म्हण आहे. माहिती चुकीची का असेना पण वेळ मारून नेण्यासाठी काहीजण या म्हणीचा प्रत्यय येईल असा वापर करताना दिसून येतात. अगदी तसाच किस्सा जिल्हा परिषदेच्याबाबतीत घडला आहे. जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठा योजनेचे टेंडरवरून जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत गोंधळ झाला. यावेळी सीईओ दिलीप स्वामी यांनी दिलेले उत्तर व आता पाणीपुरवठा विभागाने चौकशी समितीला दिलेली माहिती वेगळीच असल्याचे समोर आले आहे.

नूतन पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची सभा ४ ऑक्टोबरला झाली. या सभेत जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठा योजनेच्या टेंडरवरून बराच गोंधळ झाला होता. आमदार सुभाष देशमुख यांनी यावर लक्षवेधी केली. जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने जलजीवन मिशनच्या योजनेचे टेंडर मॅनेज करून दिल्याचा आरोप त्यांनी केला होता. यावर आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार राम सातपुते, आमदार यशवंत माने यांनीही आक्षेप घेतला होता. पालकमंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी यांच्या अध्यक्षतेखाली चार जणांची चौकशी समिती नेमली आहे. आता या चौकशी समितीला पाणीपुरवठा विभागान अहवाल सादर केला आहे. या अहवालामध्ये १९० टेंडरपैकी १४० टेंडर मंजूर झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. पण डीपीसीच्या सभागृहात मात्र सीईओ दिलीप स्वामी यांनी तक्रार आल्यावर एकही टेंडर मंजूर केले नसल्याचे सांगितले होते. त्यामुळे आता कोणाचे खरे असा चौकशी समितीला प्रश्न पडला आहे. पाणीपुरवठा विभागाकडून संबंधित पाहिली मागविले असल्याचे अधीक्षक अभियंता माळी यांनी सांगितले.



आमदार यशवंत माने यांनी दोन दिवसापूर्वी जिल्हा परिषदेला भेट दिली. त्यावेळी त्यांनी चौकशी समितीने या प्रकरणाची निपक्ष:पातीपणे चौकशी करावी, अन्यथा चौकशी समितीसाठीच आणखी एक चौकशी समिती नेमली जाईल असा इशारा दिला आहे. त्यामुळे आता हे प्रकरण चांगलेच तापले आहे.

**वेळ मारून नेण्याचा प्रयत्न**

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात पाणीपुरवठ्याचा टेंडरचा विषय चांगलाच गाजला. यावेळी सर्व आमदारांनी कार्यकारी अभियंता दीपक कोळी यांना धारेवर धरले. उत्तर देताना सीईओ स्वामी यांनी तक्रार आल्यावर आपणही एक चौकशी समिती नेमली आहे व एकही टेंडर मंजूर केले नाही असे उत्तर दिले आहे. सभागृहात सीईओ स्वामी यांनी बोललेली व्हिडिओक्लिप सोशल मीडियावर व्हायरल झालेली आहेच. वास्तविक त्यांनी नेमलेल्या चौकशी समितीने याबाबत काहीही चौकशी केली नसल्याचे आता सांगण्यात येत आहे. केवळ वेळ मारून नेण्याचा हा प्रयोग होता, असेही आता बोलले जात आहे.

**असे आहे उत्तर**

सीईओ स्वामी यांनी सभागृहात या प्रश्नाला उत्तर देताना कोणताही ठेकेदार माझ्या ओळखीचा नाही. याबाबत तक्रारी आल्यावर चौकशी समिती नेमली आहे. आक्षेप असलेले काम थांबविले आहे. एकही टेंडर मंजूर केलेले नाही. टेंडर प्रक्रिया पारदर्शकपणे पाडली जाईल तसेच एकही टेंडर मंजूर केलेले नाही.

# नागतीर्थवाडी येथे शेतकऱ्यांना मोफत फवारणी औषधांचे वाटप



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील नागतिर्थवाडी येथे कृषी विभागाच्या वतीने बुधवार दि.१२ ऑक्टोबर रोजी शेतकऱ्यांना फवारणीसाठी लागणारे किटकनाशक औषधी वाटप करण्यात आले. कृषी विभागा मार्फत सोयाबीन मूल्य साखळी मधील बुधवारी शेवटची शेतीशाळा व असलेल्या उद्दिष्टाचे वाटप म्हणून शेतकऱ्यांना फवारणीसाठी लागणारी औषधे ज्यात निंबोळी अर्क, रासायनिक कीटकनाशक, किटकासाठी ट्रॅप, सूक्ष्म, अन्नद्रव्य ग्रेड - २ याचा समावेश असलेली औषधी वाटप करण्यात आले. नागतिर्थवाडी येथे कृषी विभागाच्या प्रत्येक योजनेची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना देणे. व त्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारे तालुका कृषी विभागाचे कृषी सहाय्यक जी.पी. सुर्यवंशी यांचा शेतकऱ्यांच्या वतीने सरपंच राज गुणाले यांनी आभार मानले. यावेळी सरपंच राज गुणाले, कृषी सहाय्यक जी.पी. सूर्यवंशी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भिवंडीत खाडी पात्रात बार्ज जाळून, सक्शन बुडवून रेतीमाफियांवर तहसीलदार कार्यालया कडून कारवाई, ३६ लाखांचा मुद्देमाल नष्ट



**भिवंडी/अभिजित हिरे**

ठाणे जिल्हाधिकारी पदी अशोक शिनगारे यांच्या नियुक्तीनंतर त्यांच्या आदेशाने रेतीमाफियांवर कारवाई करण्यास पुन्हा एकदा सुरवात झाली आहे.भिवंडी उपविभागीय अधिकारी बाळासाहेब वाकचौरे व तहसीलदार अधिक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी अतुल नाईक व तलाठी यांनी मौजे काल्हेर ते कोनगाव व मुंब्रा या खाडी पात्रात जिल्हाधिकारी कार्यालयातील भरारी पथकासह कारवाई केली असता खाडीत ४ सक्शन बोटी अनधिकृत रेती उपसा करीत असताना आढळून आल्या. परंतु पथकाची चाहूल लागताच बोटी वरील कामगारांनी खाडीत उड्या मारून पळ काढला त्यानंतर या पथकाने रेती भरलेले बार्ज पेटवून नष्ट केले तर सक्शन बोटी चे खालील बाजू कडील वॉल उघडे करून ४ सक्शन बोटी बुडवून नष्ट केल्या आहेत. प्रत्येकी ८ लाख रुपये किमती चे बार्ज व प्रत्येकी ५ लाख रुपये किमतीचे सक्शन असा एकूण ३६ लाख रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला आहे.

# महात्मा बसवेश्वरने युवक महोत्सवात जिंकली रसिक प्रेक्षकांची मने

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाने राष्ट्र चेतना २०२२ या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवक महोत्सवात विविध कला प्रकारात उत्तम सादरीकरण करून रसिक श्रोत्यांची मने जिंकली. महाविद्यालयाने एकांकिका या कला प्रकारात भोग ही एकांकिका सादर करून समाज जीवनातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा यावर आसूड ओढले. अंधश्रद्धा निर्मूलन, समाज प्रबोधन हाच या एकांकिकेचा प्रमुख उद्देश होता. गाथा बळीराजाची या पोवाड्यातून शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नावर, शासकीय उदासीन धोरणावर आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर विचार व्यक्त केले. करूण आणि वीररसाने युक्त असलेला या पोवाडा गायनाने प्रेक्षकांचे डोळे पाणावले, अंगावर शहारे उभे राहिले. आंबेडकरी जलसा या गीत प्रकारात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बालपण शिक्षण राजकीय, सामाजिक कार्य, कायदेविषयक कार्य, आंबेडकरोतर दलित चळवळ, सद्य:परिस्थिती प्रेक्षकांसमोर उभी केली. समूह गीत गायन प्रकारात भारताची विविधता विशद करत उज्वल भारताची प्रतिमा तयार केली. या समूहगीत गायन प्रकारास विद्यापीठाने सर्व तृतीय पुरस्काराने सन्मानित केले. कव्वाली या गीतप्रकारात प्यार करना हो तो आपने वतनसे करो असा संदेश दिला. लोकनृत्य या कलाप्रकारात तेरहताली हा राजस्थानी लोकनृत्याचा प्रकार



सादर केला. माईम या कलाप्रकारात मानवी मनाची लुप्त होत असलेली सहकार्याची भावना आणि प्राण्यांमध्ये जिवंत असलेली सहकार्याची भावना यावर प्रकाश टाकण्यात आला. याबरोबरच पाश्चात्य गीत गायन, रांगोळी, कोलाज तालवाद्य, मिमिक्री, लावणी, व्यंगचित्र अशा विविध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्तम सादरीकरण केले. त्यांच्या या उत्तम कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. गायकवाड, उपप्राचार्य डॉ.आर.एम. लखादिवे, डॉ. भास्कर नल्लारेड्डी, डॉ.बालासाहब गोडबोले; डॉ. दिनेश मौने, प्रा. डॉ.रत्नाकर बेडगे, प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार, प्रा. डॉ.अश्विनी रोडे डा.टी.धनश्यामयांनी अभिनंदन केले. याप्रसंगी विद्यार्थिनी नम्रता वाघमारे, मिताली आगलावे, ज्ञानेश्वरी माळी, उर्मिला काळे, मुकडे शिवाली, मुजावर मेहक उपस्थित होते. रंगमंचाची ओळख नसलेल्या, अतिशय सामान्य तळागाळातील विद्यार्थ्यांना सातत्याने विविध कलाप्रकारांचे धडे देऊन त्यांची तयारी करून घेऊन आंतरमहविद्यालयीन स्पर्धेत सहभागी करून त्यांच्याकडून उत्तमोत्तम सादरीकरण करून घेणे आणि त्यांच्या सादरीकराणातून रसिक प्रेक्षकांच्या डोळ्यातून अश्रू ओघळणे हेच विद्यार्थ्यांचे, महाविद्यालयाचे खरे यश आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर आप्पा बिडवे, सचिव मन्मथआप्पा लोखंडे आणि सर्व सन्माननीय पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार, प्राध्यापक वृंद आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन, कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अनुभूती स्कूलला एज्युकेशन वर्ल्ड्स इंडिया स्कूल अवॉर्ड

## ईडब्ल्यू इंडिया स्कूल रॅंकिंगमध्ये भारतात टॉप ५ तर महाराष्ट्रात प्रथम

**जळगाव/प्रतिनिधी**

ईडब्ल्यू इंडिया स्कूल रॅंकिंग (EWISR 2022-23) मध्ये अव्वल पाच क्रमांकावर असलेल्या शाळांनी शैक्षणिक प्रतिष्ठा', 'नेतृत्व, व्यवस्थापन गुणवत्ता' आणि 'शिक्षक कल्याण आणि विकास', पैशाचे मूल्य' या श्रेणीमध्ये सर्वाधिक गुण मिळविले. यात अनुभूती स्कूल द्वारे शैक्षणिक विकासातून सामाजिक समृद्धीच्यादृष्टीने केल्या गेलेल्या विशेष प्रयत्नांमुळे सर्व सहनिवासी शाळा (को-एड बोर्डिंग) श्रेणीत महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक तर भारतातून पाचव्या क्रमांकाचे रॅंकिंग मिळाले असून त्यांना शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिष्ठेचा एज्युकेशन वर्ल्ड्स इंडिया स्कूल अवॉर्ड्स २०२२-२३' ने सन्मानित करण्यात आले. हा भव्य पारितोषिक सोहळा दिल्ली, गुरूग्राम येथील हॉटेल लीला अँबियन्स इथे पार पडला. अनुभूती स्कूलचे ज्येष्ठ शिक्षक श्री. यु. व्ही. राव यांनी अनुभूती स्कूलच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी क्रिकेटपटू श्री. जतीन परांजपे, दिल्लीस्थित करिअर कौन्सिलिंग माईंडलर कंपनीचे संस्थापक श्री. प्रतिक भार्गव यांची उपस्थिती होती. ईडब्ल्यू इंडिया स्कूल रॅंकिंग हे भारतातील शीर्ष आणि सर्वोत्तम शाळा एज्युकेशन वर्ल्ड सी फोरच्या सहकार्याने, एज्युकेशन वर्ल्ड इंडिया स्कूल रॅंकिंग (एथखडठ) २०२२-२३ सादर करते जे ३०० हून अधिक शहरांमधील भारतातील सर्वोत्तम आणि सर्वोच्च शाळांचे विश्लेषण करून रेटिंग करते आणि श्रेणी देते. ईडब्ल्यू इंडिया स्कूल रॅंकिंग (EWISR 2022-23) संकलित करण्यासाठी ११,४५८ नमुना प्रतिसादकर्ते - शिक्षणतज्ज्ञ, मुख्याध्यापक, शिक्षक, डएउ (सामाजिक-आर्थिक श्रेणी अ) पालक आणि वरिष्ठ शालेय विद्यार्थी - देशभरातील २८ शहरांमध्ये चार महिन्यांच्या कालावधीत ११८ सी फोर फील्ड संशोधकांनी मुलाखती घेतल्या. (जून-सप्टेंबर) वार्षिक एथखडठ हे जगातील सर्वात मोठे शाळा रॅंकिंग सर्वेक्षण आहे. यामध्ये सर्व सहनिवासी शाळा (को-एड बोर्डिंग) श्रेणीत टॉप ५ मध्ये स्थान पटकाविले. अनुभूती स्कूलला एज्यूकेशन वर्ल्डस इंडिया स्कूल अवॉर्डस' ने महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांने तर भारतातील पाचव्या क्रमांची शाळा म्हणून सन्मानीत करण्यात आले. निसर्गाच्या सान्निध्यात शंभर एकर परिसरात विस्तारलेली अनुभूती स्कूल इयत्ता ५ वी ते १२ पर्यत पूर्ण निवासी आहे. अनुभूतीमध्ये औपचारिक शिक्षणासोबतच अनुभवाधारित आणि भारतीय संस्कृतीचे संस्कारमूल्ये रूजविले जातात. ज्यामुळे स्पर्धायुक्त जगातसुद्धा अनुभूतीचे विद्यार्थी आपली वेगळी छाप सोडण्यास सक्षम आहेत. २०२०-२०२१ शैक्षणिक जागतिक क्रमवारीत, केंद्र आणि राज्य सरकारी शाळांमध्ये अनुभूती १५ क्रमांकाच्या रॅंकिंग होते. पहिल्यांदाच भारतातील पहिल्या पाचमध्ये तर महाराष्ट्रामध्ये अव्वल स्थानावर अनुभूती स्कूल ला बहुमान मिळाला आहे. गेल्या शैक्षणिक वर्षात शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत, अनुभवाधारित शिक्षण देण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उपलब्ध करून देण्यासाठी व्यवस्थापनाची तळमळ यामुळेच ही रॅंकिंग शक्य झाल्याचं मत अनुभूती स्कूलच्या संचालिका सौ. निशा जैन यांनी व्यक्त केलं आहे.




# अचवला मेन रोडवर दवणहिप्परगा येथील मोटारसायकलस्वारास मारहाण

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी ते वलांडी मार्गावरील अचवला मेन रोडवर मोटारसायकल मधून पेट्रोल काढणाऱ्यांना पेट्रोल का काढता असे विचारल्याने दगडाने पोटात मारून दुखापत केली. या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात गुरुवार दि.६ ऑक्टोबर रोजी रात्री सात वाजण्याच्या सुमारास दोघांसह एका अनोळखी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत देवणी पोलीसांच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, दि.६ ऑक्टोबर रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास अचवला येथे मेन रोडवर आरोपींनी संगनमत करून फिर्यादीच्या मोटारसायकल मधील पेट्रोल काढून घेत असल्याने फिर्यादीने पेट्रोल काढून का घेता असे म्हंटल्याने आरोपींनी मागील भांडनाची कुरापत काढून धक्काबुक्की केली व ज्याच्या नावाची माहिती मिळाली नाही त्या इसमाने हातातील दगडाने पोटावर उजव्या बाजूला मारून दुखापत केली. या प्रकरणी वैजनाथ केशव कांबळे राहणार दवणहिप्परगा याच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर २२८/२०२२ कलम ३२४, ३२३, ३४ भादवी प्रमाणे मंगेश धनाजी पाटील, रणजित बालाजी पाटील व अनोळखी इसम एक सर्व राहणार विळेगाव यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक कौंडमंगले हे करीत आहेत.

# अल्पवयीन पीडितेवर अत्याचार; आरोपीस वीस वर्षाची सक्तमजुरी

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

अल्पवयीन पिडितेवर लैंगिक छळ, अत्याचार व नैसर्गिक कृत्य केल्याप्रकरणी आरोपी राजू प्रकाश पिंकू राजपूत (वय ५०) यास विशेष न्यायाधीश कविता शिरभाते यांनी वीस वर्षाची सक्त मंजुरीची शिक्षा ठोठावली. या घटनेची हकिकत अशी की, पिडिता ही अल्पवयीन असून घटनेदिवशी आजी घरासमोर अंगण झाडत असताना त्यावेळेस आरोपी हा त्या ठिकाणी येऊन पिडितेस दुकानात घेऊन जातो असे सांगून स्वत:च्या घरी घेऊन जाऊन तिच्यावर अनैसर्गिक कृत्य करून लैंगिक छळ व अत्याचार केला. याबाबत पीडितेच्या आईने विजापूर नाका पोलीस ठाणे येथे रीतसर गुन्हा दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवून त्याचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक शितलकुमार कोल्हाळ यांचेकडे देण्यात आला. त्यांनी गुन्ह्यांचा तपास करून आरोपी राजू रजपूत यांचे विरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणाची सुनावणी विशेष न्यायाधीश कविता डी. शिरभाते यांचे समोर झाली. सरकार आरोपीने पीडितेवर लैंगिक छळ, अत्याचार व अनैसर्गिक कृत्य केल्याचे साक्षी पुराव्यादवारे न्यायालयाचे निदर्शनास आणले. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे



एकूण ७ साक्षीदार तपासण्यात आले. तसेच आरोपीतर्फे आरोपी स्वता: व त्याची आई असे दोन साक्षीदार तपासण्यात आले. सरकार पक्षातर्फे पिडिता, पिडीतेची आई, पिडीतेची आजी, नेत्र साक्षीदार, पंच । व तपासी अंमलदार यांची साक्ष महत्त्वपूर्ण होती. पिडिता ही अल्पवयीन असून ती न्यायालयात आरोपीने केलेल्या अनैसर्गिक कृत्य, लैंगिक अत्याचार बाबत दिलेला जबाब इतर साक्षीदार, पिडीतेची वैद्यकीय तपासणी झालेली नसताना सुध्दा याबाबत सरकारी वकील प्रकाश एस. जन्नु यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून विशेष न्यायाधीश कविता डी. शिरभाते यांनी आरोपी राजू रजपूत यास बाललैंगिक अत्याचार कायदान्वये दोषी धरण्यात आले व आरोपीस २० वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यात आली. या प्रकरणात सरकारपक्षाच्या वतीने सहा. सरकारी वकील प्रकाश जन्नु व दत्ता पवार यांनी काम पाहिले. तर आरोपीच्या वतीने वकील ए.डी. कुलकर्णी यांनी काम पाहिले.

# जिल्हा परिषद सीईओंना साडी-चोळीचा आहेर; रस्ता मिळत नसल्याने नारायण चिंचोली ग्रामस्थांचे आंदोलन

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली ते रोपळे दरम्यानचा रस्ता एका शेतकऱ्याने जेसीबीच्या सहाय्याने खोदून बंद केला आहे. याप्रकरणी उपोषण केल्यानंतरही रस्ता होत नसल्याने नारायण चिंचोली येथील ग्रामस्थांनी मंगळवारी सोलापूर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्याकरीता साडी चोळीचा आहेर आणला. जि.प.सीईओ स्वामी हे दुपारी जि.प. मुख्यालयात नव्हते. त्यांच्या दालनाभोवती मात्र नारायण चिंचोली येथील ग्रामस्थ एकत्रित आले होते. यात महिलांचाही समावेश मोठ्या संख्येने होता. जि.प.बांधकाम विभाग क्रमांक दोनचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांनी बुधवारी रस्ता मोकळा होईल असे आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी पुन्हा गावाकडे साडी-चोळीची गाडी वाटेतच अडवली जि.प.सीईओ दिलीप स्वामी यांना देण्यासाठी साडी चोळीचा आहेर आणण्यात येत असल्याची बातमी लागताच नारायण चिंचोळी येथील ग्रामस्थांचे वाहन सिध्देश्वर




मंदिराजवळच अडविण्यात आले. साडी चोळी वाहनातच ठेवून त्यांना झेडपीत प्रवेश देण्यात आल्याची माहिती यावेळी ग्रामस्थांनी दिली. परतण्याचा निर्णय घेतला. रस्ता नसल्याने सुमारे दोनशे ग्रामस्थांना येण्या जाण्याची अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे याप्रकरणी पंढरपूर तहसील कार्यालयासमोर ग्रामस्थांनी काही दिवसापुर्वी उपोषण केले होते. जि.प. कार्यकारी अभियंता कुलकर्णी यांनी उपोषण कर्त्याची भेट घेत रस्ता करण्याचे आश्वासन दिल्याने उपोषण मागे घेण्यात आले होते. मात्र नंतर उपोषण कर्त्यावरच पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. रस्ताही न झाल्याने संतप्त ग्रामस्थांनी पुन्हा जिल्हा परिषदेची वाट धरली. बुधवारी जर रस्ता न झाल्यास यापुढील तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी ग्रामस्थांनी दिला. यावेळी अभिजित कोले, आप्पा गुंड, मारुती चव्हाण, भास्कर गुंड, तानाजी गुंड, विकास भोसले, अशोक कोले, यशवंत कंदारे, गणेश गुंड, शंकर रणदिवे, परमेश्वर रणदिवे यांच्यासह अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# नागराळ येथे वन्यजीव संवर्धन व जनजागृती सप्ताह साजरा

देवणी/प्रतिनिधी




महाराष्ट्र फॉरेस्ट डीपारमेन्ट रेंज विका लातूर अंतर्गत नागराळ येथे वन्य जीव व जनजागृती सप्ताह विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला तेव्हा नागराळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला त्यावेळी विद्यार्थ्यांना वन्य जीव प्राण्यांची माहिती देण्यात आली व यावेळी वृक्षारोपण करण्यात आले याप्रसंगी नागराळचे सरपंच विष्णू ऐनिले शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वन्यजीव सप्ताहाचे आयोजन वनपाल तेलंगे व वनरक्षक डिगोळे यांनी केले होते. वन्य जीव संवर्धनासाठी नागरिकांमध्ये जन जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जागतिक वन्यजीव सप्ताह ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात साजरा केला जातो भारतीय वन्यप्राण्याचे जीव वाचवण्याच्या महत्वाच्या उद्देशाने अथक प्रयत्नांनी १९५२ मध्ये गंभीर पाऊले उचलण्यात अली त्यावेळी सर्वप्रथम हा सप्ताह साजरा करण्यात आला त्यानंतर भारत सरकारने वन्यजीव मंडळाची स्थापना केली प्रत्येक वर्षी जागतिक वन्यजीव सप्ताह साजरा करण्यास सुरुवात झाली. राज्यातील वन्यजीव व्यवस्थापणाचे उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून वन विभागाने स्टेट वाईल्ड लाईफ अक्शन प्लॉन आखला आहे२०२१ ते २०३१ या दहा वर्षासाठी तो असून याला मंजुरी मिळाल्यास हा राज्यातील पहिला प्रकल्प ठरणार असल्याचे वनाधिकारी तेलंग यांनी सांगितले यावेळी कमलाकर फुले सह अनेक नागरिक उपस्थित होते वनरक्षक डिगोळे यांनी आभार मानले.

# भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी

वाडा/प्रतिनिधी



मिसाइल मॅन आणि भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाडा शहरातील महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी वाचनालयात त्यांचे प्रेरणा दायक विचार असलेली पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध करून दिली होती. यासंधीचा सदुपयोग करण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांनी वाचनालायला भेट देऊन पुसत वाचनाचा आनंद घेतला.१५ ऑक्टोबर १९३१ रोजी भारतरत्न अब्दुल कलाम यांचा जन्म झाल्याने हा दिवस जागतिक विद्यार्थी दिवस म्हणूनही साजरा केला जातो. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानासाठी ते सदैव स्मरणात राहतील.

पान १ वरून...

## पतीचा खून केला कुणी...

मदतीने सोपान झाल्टेचा यांची हत्या केल्याची बाब समोर आली आहे. पत्नी मळ्यात झोपायला गेल्याची माहिती पत्नीने प्रियकराला दिली होती. त्यात प्रियकराने मित्रांच्या सहाय्याने लाकडी दांडक्याने सोपान झाल्टे यांच्या डोक्यात मारत त्यांचा खून केल्याची कबुली संशयितांनी दिली आहे. त्यात सोपान यांचे वडील मध्ये आल्याने त्यांनाही जबर मारहाण करण्यात आली असून ते गंभीर जखमी आहेत. या खुनाची उकल करण्यासाठी पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. नाशिकच्या ग्रामीण पोलीस दलाने पत्नीला विचारपूस केल्याने उलट-सुलट उत्तरे दिल्याने पोलीसांना संशय आला होता. संशयित आरोपी मनीषा झाल्टे कातरवाडी येथीलच सुभाष संसारे याच्याशी गेल्या काही वर्षापासून अनैतिक संबंध आहेत. सोपान झाल्टेचा यांचा या अनैतिक संबंधात अडचण येत असल्याने त्यांना जीवे ठार मारण्याचा प्लॅन पत्नी मनीषा आणि प्रियकर सुभाष यांनी आखला होता. सोपान हे ट्रक आणि शेतीचा व्यवसाय करत होते, ते घरी आल्याची माहिती पत्नी मनीषा हिने प्रियकर सुभाष याला दिली होती. मनमाड येथील खलील नावाच्या मित्राला घेऊन सुभाष याने सोपान यांच्या डोळ्यात मिर्चीची पूड टाकत लाकडी दांडक्याने डोक्यात मारहाण केली आणि जीवे ठार मारले आहे.

## निवडणूक जिंकण्यासाठी स्मशानात...

वर्तुळ आढळले. त्यात गुलाबी रंगाचे कुंकू भगव्या रंगाची चांदणी तसेच जादू टोन्याचे साहित्य आढळले. या प्रकरणी १५/१०/२०२२ रोजी वाडा पोलीस ठाण्यात गु.र.क्रमांक ३८७/२०२२ भा.द.वी.स.क.१४३,३४,५०६ सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट अघोरी प्रथा तथा जादुटोनाप्रतिबंधक अधिनियम २०१३ च्या कलम ३(२) व ३(३) सह म.पो.का.क.३७१ चा भंग १३५ प्रमाणे सागर सुरेश गायकर, कैलास विलास गायकर, शिवनाथ अर्जुन गायकर, संदेश अर्जुन गायकर, महेश काशिनाथ जाधव, संतोष हरी जाधव, विश्वास सदानंद जाधव, मिलिंद ज्ञानेश्वर जाधव, चेतन दामोदर जाधव, विकास ठाकरे रा. खारीवली पौलबारे वाडा जि. पालघर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या सर्व आरोपींना सीआरपीसी ४१(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे. या प्रकरणी वाड्याचे पोलीस निरीक्षक दशरथ पाटील अधिक तपास करीत आहेत. निवडणुकीत निवडून येण्यासाठी अशा प्रकारची काळी जादू करून अंधश्रद्धेला आणखी जास्त प्रोत्साहन देण्याच्या अशा प्रकरण आळा घालण्यासाठी सरकारने कठोर पावले उचलावीत. अन्यथा निवडणुकीच्या तोंडावर अशाच प्रकारच्या काळ्या जादु केल्या जातील आणि त्यासाठी नरबळी द्यायलाही राजकारणी मागे पुढे पाहणार नाहीत अशी प्रतिक्रिया लोक व्यक्त करीत आहेत.

## पूर्ववैमनस्यातून गोळीबार केला...

होती. कांदिवली पोलिसांनी घटनास्थळचा पंचनामा करून, कांदिवली पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गु.नो. क्र . १२५६/२०२२ कलम ३०२, ३०७, ५०४, ३४ भादवि सह कलम ३,२५ भा.ह.का.प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आणि या गुन्ह्याचा तपास सुरु झाला. कांदिवली सारख्या गजबजलेल्या ठिकाणी गोळीबारा सारखी घटना घडल्याने शहरात कायदा सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजले होते. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) सुहास वारके, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) एस. विरेश प्रभू, पोलीस उप-आयुक्त (प्र-१) संग्रामसिंह निशाणदार व सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण - उत्तर) काशिनाथ चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली होती. त्यांच्या मागदर्शनाखाली गुन्हे शाखा ११चे प्रभारी पोलीस निरीक्षक विनायक चव्हाण यांचे नेतृत्वाखाली दोन पथके तयार करण्यात आली होती. यामध्ये पो.नि पाटील, गवस, मोने, स.पो.नि. पाटील, मसपोनि यादव, पोउनि कानगुडे अंमलदार कांबळे, सत्यनारायण नाईक, रामचंद्र शिंद, सुधीर तरटे, चंद्रसेन गायकवाड, चंद्रकांत गवस, महादेव नावगे, गिरीष सुर्वे, गणेश केणी, विक्रांत खांडेकर, अजय कदम, सचिम खताते, प्रविण सावंत, सोनाली लाडे, महेश रावराणे, विजय देशमुख, रुक्साना शेख, जयश्री गोसावी, सुशांत पाटील, चालक प्रशांत ढगे, उपेंद्र मोरे इत्यादीचा समावेश होता. हे पथक आरोपीचा शोध घेण्यासाठी शहरात फिरत होते. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळी व आजूबाजूला माहिती काढली असता संशयित आरोपी सोनू पासवान व त्याचा सहकारी सोनू गुप्ता या दोघांची नावे पुढे आली. पोलिसांनी त्यांच्या नातेवाईकांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांच्याकडे चौकशी केली. परंतु त्यांनी या दोघांबाबत काहीच माहिती नसल्याचे सांगितले. ते दोघे कुठे पळून जाऊ शकतात? या विषय विचारले असता त्यांनी आपल्या जवळील काही नातेवाईकाचे पोलिसांना पत्ते दिले. त्या ठिकाणी जाऊन आरोपीचा शोध घेण्यात आला. परंतु तेथे ही आरोपीचा ठावठिकाणा लागला नाही. दरम्यान पोलिसांची शोध मोहीम सुरू असताना आरोपी हे गुजरात राज्यातील बिलीमोरा येथे बहीणीकडे गेल्याची माहिती मिळून आली . तात्काळ पोनि पाटील, पोनि घोणे, सपोनि पाटील व पथक हे बिलीमोरा येथे रवाना झाले. परंतू आरोपीचा मोबाईल बंद असल्याने त्यांचा शोध घेण्यात अडचणी येत होत्या. गुन्हे शाखेच्या पथकाने बिलीमोरा येथे जावून अधिक चौकशी केली परंतू आरोपीचा शोध लागत नव्हता. याच दरम्यान बिलीमोरा रेल्वे स्टेशन येथे गुन्ह्यातील आरोपीच्या वर्णनाशी मिळते जूळते दोन व्यक्ती संशयितरित्या दिसून आले. लागलीच पथकाने त्यास ताब्यात घेतले. त्यांची अधिक चौकशी केली असता त्यांनी गुन्हयाची कबूली दिल्याने त्यांस ताब्यात घेण्यात आले. तपासामध्ये या गुन्हयात वापरलेली ॲक्टीव्हा मोटार स्कूटर व गावठी पिस्टल पंचनामा करून हस्तगत करण्यात आलेले आहे. गुजरातहुन पोलीस या दोघांना मुंबईत घेवून आले. सुरुवातीला या दोघांना न्यायालयात हजर करून त्यांची पोलीस कोठडी मिळवण्यात आली. त्यानंतर कांदिवली गुन्हे शाखेच्या कार्यलयात आणून त्यांची कसून चौकशी करण्यात आली तेव्हा त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. सोनू चंद्रभान पासवान (वय २७) आणि सोनू रामकिशन गुप्ता (वय २०) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. सोनू पासवान हा कांदिवली येथील लालजी पाडा भागातील जय भारत इमारतीत राहत होता. तो मूळचा बिहारच्या सिवानचा रहिवासी आहे. तो मुंबईत चार्टर्ड अकाउंटंटकडे काम करतो. त्यांने बिहारमधून शस्त्रे आणली होती. या गोळीबाराच्या घटनेची सुरुवात जिलेबी खाण्यापासून झाली होती. काही दिवसांपूर्वी कांदिवलीच्या हद्दीत बांधलेल्या लिंक रोडवर परिसरातील काही मुले जिलेबी खात होती. तिथे एक मुलगीही होती. त्यावेळी सोनू पासवान त्याच्या काही साथीदारांसह तेथे पोहोचला.जलेबी खाण्यावरून दोन्ही गटात भांडण झाले. त्यात आरोपी सोनू त्याच्या साथीदारांनी तेथे उपस्थित असलेल्या एका मुलावर धारदार शस्त्राने वार केले. या हल्ल्यात मुलगा गंभीर जखमी झाला. कांदिवली पोलिसांनी कलम ३२६ अन्वये गुन्हा दाखल करून आरोपी सोनू, त्याच्या साथीदारांचा शोध सुरू केला होता. शुक्रवारी रात्री नवरात्रीमध्ये लोक दांडिया खेळण्यात व्यस्त असताना मोंटूचा बदला घेण्यासाठी सोनू पासवान दारूच्या नशेत त्या भागात पोहोचला. तिथे आधीच उपस्थित असलेल्या अंकित यादव, अभिनाश दाभोलकर, मनीष गुप्ता, प्रकाश नारायण यांच्याशी हाणामारी झाली. ज्यामध्ये एका व्यक्तीने सोनूला पकडून खाली फेकले. ज्यामध्ये सोनूचे पिस्तूल जमिनीवर पडले. त्याच क्षणी सोनूने जमिनीवर पडलेले पिस्तूल उचलले. त्यांने पिस्तुलातील सर्व गोळ्या अंकितसह त्याच्या १ आक्टोबर रोजी रात्री नवरात्रीमध्ये लोक दांडिया खेळण्यात व्यस्त असताना मोंटूचा बदला घेण्यासाठी रात्री १२.१५ च्या सुमारास कांदिवली (पश्चिम) येथील कल्पवृक्ष हाईट बिल्डिंगच्या गेटच्या समोर न्यू लंक रोड, या ठिकाणी सोनू पासवान व सोनू गुप्ता हे दोघे स्कूटर वरून त्या ठिकाणी आले. तेथे दिनकर पाल व त्याचे मित्र अंकित यादव व अविनाश दाभोळकर गप्पा मारत उभे होते. यावेळी स्कूटरवरून आलेल्या सोनू पासवान व सोनू गुप्ता या दोघांनी दिनकर पाल व त्याचे मित्र अंकित यादव व अविनाश दाभोळकर यांना शिवीगाळ केली. या गोष्टीचा त्यांना राग आला. या रागाच्या भरात या तिघांनी सोनू गुप्ता याला पकडले आणि त्यांच्यात झटपट झाली. यावेळी सोनू पासवान याने आपल्या जवळील गावठी पिस्टलमधून अंदाधुंद गोळीबार केला. पिस्टल मधील ५ गोळ्या अंधाधुंद झाडल्याने यातील एक गोळी अंकितच्या छातीत घुसली, तर दुसरी गोळी अविनाश दाभोलकर यांच्या पोटात गोळी घुसली तर रस्त्याने जाणारे पादचारी मनीष गुप्ता व प्रकाश नारायण यांच्या पायाला गोळी लागल्याने ते सुध्दा या गोळीबारात जखमी झाले. या गोळीबाराच्या आवाजाने आजूबाजूला फुटपाथवर झोपी गेलेले सर्व लोक पळून गेले. बिल्डिंग मधील लोकांनी आधीच दार-खिडक्या बंद केल्या होत्या. दरम्यान गोळीबार करून सोनू पासवान व सोनू गुप्ता हे दोघेही एक्टिवा स्कूटर वरून बोरीवलीच्या दिशेने पळून गेले. रात्री अंकितच्या मृत्यूची बातमी कळताच दोन्ही आरोपी मुंबईहून बोरिवलीला जाणारी गाडी पकडून गुजरातमधील बिलीमोरा येथे बहीणीकडे पळून गेले. या आरोपीनी युट्युब वरून व्हिडीओ बघून गोळीबार कसा करायचा याचे प्रशिक्षण घेतले होते. कांदिवली परिसरात आपली दहशत माजवण्यासाठी पासवान नावाची टोळी या परिसरात सक्रिय होती. त्यातून हा गोळीबार करण्यात आला असे पोलिसांचे म्हणणे आहे. या प्रकरणी दिनकर चमन पाल (वय ३०) यांच्या फिर्यादी वरून सोनू चंद्रभान पासवान (२७) आणि सोनू रामकिशन गुप्ता (२०) या दोघांना २४ तासात अटक करून गुन्हे शाखेने त्यांच्या मुसक्या आवळल्या.

## टायगर टोळीतील वर्चस्वाचा वाद ...

नव्हता. दोघे ही अमोरा समोर आले की एकमेकाडे खुन्नशी नजरेने पाहणे, शिवीगाळ करणे, एकमेकांना बघून घेण्याची भाषा करणे असा उदयोग करीत होते. त्यामुळे गॅगमधील भांडणांनी डोके वर काढले होते. गॅगमधील म्होरक्या महेश मुरारी हा लोकांना धमकावणे, त्याच्याकडून हप्ता वसुल करणे कामे करीत होता.या गॅगमध्येच दोन गट निर्माण झाल्याने गावातील वातावरण तसे बिघडलेले होते. कारण गावात कोणताही सार्वजनीक कार्यक्रम असला की, त्या कार्यक्रमात या गॅगमध्येच राडा हा ठरलेला असायचा.त्यामुळे गावात जत्रा किंवा इतर कार्यक्रम घ्यावयाचा की नाही असा प्रश्न काही मंडळीना पडललेला असायचा. या गॅगमधील तरूण दादागिरी करीत असल्याने गोकाक आणि सुळेभावी येथील लोकांचे जीणे हराम झाले होते. काही ना काही कारण सांगून हप्ता वसुल करायचे सरळ मार्गी लोकांना धमकावयाचे याच्या तक्रारी पोलीस स्टेशनला आल्या होत्या. त्यामुळे पोलीसांच्या रडारवर या गॅगमधील तरूण होते.गोकाक पोलीसांच्या नजर त्याच्यावर बारकाईने होती. आपसातील भांडणाने या गॅगमध्ये फुटीची चिन्हे होती. महेश मुरारी आणि प्रकाश पाटील हे दोघे ही गॅग सांभाळत होते. त्यातच प्रकाश याचे ससा याच्याशी वैरवाद असल्याने ससा हा गॅगमधील काही जणांना फितवत होता.त्याच्या बाजुने यल्लेश पाटील, मजुंनाथ परेशी, देवाप्पा कुकडोळी, संतोष हरबरट्ची, भरमाप्पा नायक हे होते. यातील काही जण गवंडी काम करीत होते. तर काही जण काहीही कामधंदा न करता राहत होते. त्यामुळे त्याच्या हाताला कामधंदा नसल्याने हे बेरोजगार होते. त्यातून या गॅगमध्ये राहून ते पैसे कमवायचे स्वप्न बघत होते. पोलीस रेकॉर्ड वर यातील काही जणांची नावे होते. तर काही जणांच्यावर गुन्हे ही दाखल झाले होते. रिकाम्या हाताला काही कामधंदा नसल्याने हे तरूण या गॅगमध्ये सामील झाले होते. प्रकाश पाटील आणि ससा याच्यात आता या गटात वर्चस्ववाद निर्माण झाला होता. ते दोघे ही या गॅगमधील तरूणांना आपआपल्या बाजुला वळवून घेण्यासाठी धडपडत होते. ससा याच्याकडे आठ ते दहा जण होते. त्यामुळे तो प्रकाश याला धमकी देत होता. मागे भांडणाच्या वेळी यातील सहा ते सात जणांनी त्याला जबर मारहाण करीत गॅगमधून बाजुला हो नाही तर तुला सोडत नाही तु गॅगमध्ये राहू नकोस असे सांगितले होते.त्यावेळी प्रकाश याने ही त्याच्या या पोकळ धमकीकडे दुर्लक्ष करीत त्याना किंमत दिली नव्हती. उलट तोच त्यांना मी एकेकांना बघून घेईन असे म्हणाला होता. प्रकाश हा खूनाच्या गुन्हयात अडकला असल्याने त्याला सहजा सहजी बाजुला काढता येईल अशी अटकळ शशिकांत उर्फ ससा याने बांधली होती. खरे तर त्याच्यातच आणि प्रकाश याच्यात व्यक्तीगत भांडण होते. पण ही भांडणे त्या दोघांनी ही गॅगमध्ये आणली होती.प्रकाश याच्या बाजूने महेश मुरारी हा होता.तो प्रकाश याच्या बाजूने नेहमी बोलत असल्याने ससा त्या दोघांच्यावर ही चिडून होता.त्याला प्रकाशला कायमचा धडा शिकवायचा होता.पण तशी संधी त्याला मिळत नव्हती. कारण प्रकाश बरोबर महेश हा सावली सारखा राहत होता. त्याला प्रकाशला संपवून गॅगमध्ये वर्चस्व गाजवायचे होते. म्हणून तो त्याला संपवायला निघाला होता. प्रकाश पाटील हा आपल्या व्हॉटसअॅपवर वेगवेगळी स्टेटस ठेवत होता. गॅगमध्ये मै हूॅ डॉन असे तो कळत न कळत सांगत होता. त्याच्या या रिल्सला ससा आणि त्याचे साथीदार ही तसेच उत्तर देत होते. त्याच्यामध्येच आता गॅगवार होण्याची चिन्हे होती. प्रकाश हा सोशल मिडियावर चिथावणी खोर रिल्स टाकत असल्याने ससा याला त्याच राग आलेला होता. काही ही करून प्रकाश याला संपवायलाच पाहिजे अशी त्याची धारणा झाली होती. त्याने आपल्या साथीदारांना प्रकाश याचेवर नजर ठेवण्यास सांगितले. गुरूवार दि.६ ऑक्टोंबर रोजी रात्री ८.३० ते ९ च्या दरम्यान प्रकाश आणि महेश हे दोघेजण गावातील छ.शिवाजी महाराज पुतळ्या जवळीच चौकात जेवण खान करून थांबले होते.तसे ते दोघे ही दारूच्या नशेत होते.नेमके त्यावेळी शशिकांत उर्फ ससा, यल्लेश पाटील, मंजुनाथ परोजी, देवाप्पा कुकडोळी, संतोष हणबरहट्टी, भरमाप्पा नायक हे सहा जण आपल्या तीन दुचाकीवरून तेथे आले. ते ही दारूच्या नशेत होते. त्यांनी आपल्या दुचाकी त्या दोघांच्या भोवती फिरवत ,त्यांना आता आम्ही तुम्हा दोघांना सोडत नाही असे म्हणत शिवीगाळ करू लागले. प्रकाश हा त्याना घाबरणारा नव्हता.तो त्याच्या एका दुचाकीला आडवत त्या गाडीवरील दोघांना त्यांने खाली पाडले.ती दुचाकी फरफटत बाजुला पडली. त्यावेळी प्रकाश हा त्यांना मारायला गेला असता इतरांनी आपल्या गाडया बाजुला लावीत त्याला घेरून मारहाण करू लागले. प्रकाश याला सोडवायला महेश हा मध्ये पडला असता ससा आणि त्याच्या साथीदारांनी त्या दोघांच्या डोळ्यात मिरचीची पूड टाकली. त्यामुळे त्या दोघांना ही पुढचे काही दिसत नव्हते. ते दोघे ही डोळे चोळत खाली पडले असता ससा आणि इतरांनी त्या दोघाच्यावर आपल्याकडील धारदार शस्त्रांनी वार करीत त्यांना रक्तबंबाळ केले. प्रकाश याच्या डोक्यावर मानेवर, तर महेश याच्या छातीवर त्यांनी कोयत्यांनी वार केले. त्याचे वर्मी घाव बसल्याने ते दोघे जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडले. घटनास्थळी मोठी धुमचक्री चालली होती. बाजुला गाडया आणि चप्पला पडल्या होत्या. गावात ही बातमी समजात लोक ही घटनास्थळी धावून आले. लोक घटनास्थळाकडे येताना बघून ससा आणि त्याच्या साथीदारांनी घटनास्थळीच कोयता आणि इतर शस्त्र टाकून पळ काढला. घटनास्थळी पडलेल्या महेश मुरारी आणि प्रकाश पाटील याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती एकाने मरिहाळ पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून दोघांचे ही मृतदेह शवविच्छेदना साठी गोकाक येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिले. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत प्रकाश पाटील यांच्या नातेवाईका कडून घेतली. प्रकाश पाटील आणि महेश मुरारी हे दोघे ही यापूर्वीच पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याने ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याचा अंदाज पोलीसांना आला होता.घटना स्थळावरील सीसीटीव्हीचे फुटेज पोलीसांनी तपासले असता त्यात ही घटना कॅमेराबध्द झाली होती. ते सीसीटीव्ही फुटेज पोलीसांनी तपासाला घेतले असता त्यात मारेकरी स्पष्ट दिसत होते. घटनास्थळावरून मारेकरी पळून गेले असल्याने पोलीसांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न चालविला होता. पण घटना घडून ही २४ तास उलटले तरी त्याचा शोध पोलीसांना लागत नव्हता.त्यामुळे गावातील वातावरण कमालीचे बिघडले होते.गावात कोणताही अनुचीत प्रकार घडू नये म्हणून पोलीसांनी तगडा बंदोबस्त लावला होता. या घटनेतील संशयीत आरोपीचे मोबाईल लोकेशन बेळगाव जिल्हयाच्या बाहेर मिळत होते. त्याच्या शोधासाठी पोलीस उपायुक्त रविंद्र गडादी, पोलीस निरी. महांतेश बसापूर याच्या मार्गदर्शनाखाली मरिहाळ पोलीसांनी वेगवेगळी पथके तयार केली.पोलीस त्याचा शोध घेत असताना यातील मुख्य संशयीत आरोपी शशिकांत उर्फ ससा मिसाळे हा बेळगाव येथे पोलीसाच्या गळाला लागला.पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने हे दुहेरी खून कोणत्या कारणातून केले याची माहिती पोलीसांना देवून आपल्या इतर साथीदारांची नावे सांगितली. त्याने दिलेल्या माहिती वरून पोलीसांनी त्याच्या इतर साथीदरांना ही ताब्यात घेतले. त्यांनी ही आपला गुन्हा मान्य केला. या घटनेची लेखी तक्रार मयताच्या नातेवाईकांनी दिल्याने पोलीसांनी प्रकाश हुंकारी-पाटील (वय २४) महेश मुरारी (वय २६) याच्या खून प्रकरणी शशिकांत उर्फ ससा जट्टू मिसाळे (वय २४) यल्लेश सिदाई हुंकारी-पाटील (वय २२) मंजुनाथ शिवाजी परोजी (वय २६) देवाप्पा रवी कुकडोळी रा.सर्वजण सुळेगावी, सतोंष यल्लाप्पा हणबरहट्टी (वय २०)आणि भरमाप्पा नागाप्पा नायक (वय २०) रा.दोघे ही खनगाव बी.के याच्या विरोधात आयपीसी कलम ३०२, आणि इतर कलमासह गुन्हा दाखल करून त्यांना कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी बेलगाव हिंडलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता, चाकू आणि तीन मोटार सायकली जप्त केल्या. या घटनेचा पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मरिहाळ पोलीस करीत आहेत.

पान ८ वरून....

## शेतकऱ्यांच्या हक्काचे खत...

खबऱ्याच्या मदतीने पाळत ठेवुन सापळा लावुन निमकोटेड युरियाची साठवणुक करून शासनाची व शेतकऱ्याची फसवणुक करणाऱ्याचा पर्दाफाश केला आहे. या रॅकेटची पाळेमुळे पोलीस तपासात समोर येतील त्यानुसार आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता तपास अधिकारी चेतन पाटील यांनी व्यक्त केली आहे. कृषी सोसायटी मार्फत अथवा शासनमान्य कृषी सेवा केंद्रातून विक्रीसाठी अत्यल्प दरात खत शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले जाते. अशाच ठिकाणाहून शेतकऱ्यांच्या हक्काचा खताचा साठा माफिया काळ्या बाजारात विक्री साठी साठवीत असल्याचा कयास व्यक्त केला जात आहे.

## महिलांच्या आरोग्यासाठी उल्लेखनिय...

असे समजून चालणाऱ्या डॉ. कल्याण बरमदे यांनी मागच्या काही वर्षात मुंबई - पुण्याच्या तुलनेत अगदी नाममात्र शुल्कात दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे काम केले आहे. त्यांच्या महिलांच्या आरोग्यासाठी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून हा सन्मान करण्यात आला. डॉ. बरमदे यांच्या या सन्मानाबद्दल लातूर आयएमएच्या सर्व पदाधिकाऱ्यांसह स्त्री रोग तज्ञ संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## श्रमजीवी संघटनेचे सत्याग्रह ...

सदरच्या मागण्यांची आपण गांभीर्याने दखल घेऊन त्यांची तात्काळ पुर्तता करावी अन्यथा पुन्हा तीव्र आंदोलन जगण्यात येईल असा इशारा दिला. यावेळी श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी तहसीलदार डॉ.उद्धव कदम यांना भेटून मागण्यांचे निवेदन दिले. याप्रसंगी संपर्क प्रमुख रफिक चौधरी, भारत जाधव, सुरज दळवी, प्रमिला तरसे, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कोळी समाजाच्या जात पडताळणीसाठी...

आघाडीच्या काळात तत्कालीन पालकमंत्र्यांनी निधी वाटपात औसा व निलंगा मतदार संघावर अन्याय केला होता. असा आरोप त्यानी केला. यावेळी अभिमन्यू पवार म्हणाले की, निलंगेकर घराण्याचे वलय मोठे असून मी सामान्य कार्यकर्ता आहे. तुम्ही जे सुचना कराल ते मी मान्य करतो चिंचोली भंगार हे आमदार निलंगेकर यांचे गाव असल्यामुळे या गावासाठी कोणताही निधी कमी पडू देणार नाही. कोळी समाजाच्या मागण्यासाठी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्याकडे कायमचा मिटवण्यासाठी कोळी समाजाचे वकीलपत्र मी आणि आमदार निलंगेकर घेत आहोत अशी ग्वाही आमदार पवार यानी उपस्थित समाज बांधवासमोर दिली.

शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी फळबाग लागवडीकडे वळावे असे आव्हान त्यानी यावेळी केले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक रमेश नलमले यानी केले तर आभार माधव मुडे यानी मानले. यावेळी परीसरातील कोळी समाजाचे महिला पुरूष मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी हरिशचंद्र मुडे, भिवाजी ऐकेले, किशोर नलमले यासह आदीनी परिश्रम घेतले

## माता पिता हेच आपले दैवत आचार्य ...

श्रेष्ठ असल्याचे सांगून ज्ञानाने अहंकार नष्ट होतो. मानवाने मात्र पित्रऋणातून मुक्त व्हावे असे जाहीर आवाहन केले. शिव कथेच्या या पाच दिवशी दुपारी बारा ते चार च्या दरम्यान अत्यंत अभ्यासपूर्ण सुश्राव्य आवाजात सिबप कथाकार बाबुराव सोनटक्के महाराज करंजीकर यांनी अतिशय सुंदर आणि लक्षवेधी कथा सांगून शिव पार्वतीचा विवाह सोहळा अत्यंत उत्साहाच्या वातावरणामध्ये संपन्न केला. यावेळी मातोश्री श्रीमती सुशीला बाई पुणे यांच्या वजनाच्या प्रमाणे १०१ ग्रंथ व भस्म तुला करण्यात आला. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब जाधव, सभापती शिवानंद हेंगणे यांचे पुणे यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी मनोगत पर भाषणे झाली. कवयत्री जयश्री चावरे यांनी शिवकथेवर तयार केलेली कविता सादर केली. प्रास्ताविक सुंदर साखरे यांनी सूत्रसंचलन राम तत्तापुरे यांनी परिचय ओम पुणे यांनी तर आभार राजकुमार पुणे यांनी मानले. या शिवकथेसाठी संगीत संच म्हणून सुहास बेंद्रीकर, वैजनाथ मुरुडे ,गायक विठ्ठल कुडमे, वादक राच्याया स्वामी लोहगावकर यांची सुंदर साथ होती. या सोहळ्यासाठी आडत व्यापारी गुंडप्पा तत्तापूरे, मारुती देवपूजे, शि भ प राजेश्र्वर स्वामी लाळीकर, शि भ प विश्वनाथ स्वामी वडवळकर, शिभ प राजकुमार वाघमारे हरंगुळकर, शि भ प लक्ष्मण विभुते, शि भ प विश्वनाथ कल्याणी सताळकर यांच्यासह महिला व शिवप्रेमी नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. शिव कथा यशस्वी करण्यासाठी संयोजक राजकुमार पुणे, हावगीराज पुणे, सूर्यकांत पुणे, बाबाराव पुणे, बालाप्रसाद पुणे, यांच्यासह मित्रपरिवारांनी विशेष परिश्रम घेतले.

17 TO 23 OCTOBER 2022 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 10/15/2022 10:02 PM Page 1



## बाभळगाव ग्रामीण रुग्णालयात कर्करोग निदान शिबीर




**लातूर/करकरे अंबादास**

लातूर, ग्रामीण रुग्णालय बाभळगाव स्तन व योनीमुख कर्करोग निदान शिबीर ग्रामीण रुग्णालय बाभळगाव येथे स्तन व योनीमुख कर्करोग निदान शिबीराचे आयोजन केले होते. श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी सदरील शिबीराचे उदघाटन केले. जिल्हाधिकारी बी. पी. पृथ्वीराज, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अभिनव गोयल व तसेच विलासराव देशमुख शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अधिष्ठाता डॉ सुधीर देशमुख कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या शिबीरामध्ये एकुण ३२७ महिला रुग्णांनी सहभाग नोंदविला, सर्व रुग्णांची तज्ञ वैदयकिय अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात आल्या. पॅप स्मेअर-९२, व्ही. आय.ए. ९७. एफएनएसी ०४, रक्त तपासणी व योग्य औषधी उपचार करण्यात आले. तपासण्याचे अहवाल प्रलंबित आहेत. श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी उपस्थित महिलांना त्यांच्या आरोग्याबद्दल अधिकाधिक दक्ष राहण्याबाबत मार्गदर्शन करुन महिलांच्या संदर्भातील कोणतेही आजार उद्भवल्यास किंवा शरिरावर गाठ आढळल्यास त्वरीत डॉक्टरांना दाखवावे. जेणेकरुन कॅन्सरसारखा दुर्धर आजारही निदान झाल्यास उपचार केले जावू शकतात.

जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी सदरील रुग्णाचे उपचार महात्मा फुले जनआरोग्य योजनेतुन करण्याचा मानस असल्याचे स्पष्ट केले. डॉ. श्रीमती मीरा चिंचोलकर, डॉ श्रीमती सारीका देशमुख, डॉ. श्रीमती वैशाली दाताळ, डॉ. श्रीमती जाजु डॉ. काळे व इतर तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परीषद लातूर, जिल्हा शल्य चिकित्सक लातूर, अतिरीक्त जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परीषद लातूर, वैदयकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांची, हे शिबिर यशस्वी करण्याचे सामुहिक प्रयत्न केले.

## दिवाळीपूर्वी लाभार्थ्यांना धान्य वितरीत करण्यात येणार

लातूरः राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय, प्राधान्य कुटुंब व एपीएल शेतकरी योजनेतील पात्र शिधापत्रिका धारकांना दिवाळी सणानिमित्त अन्नधान्याच्या व्यतीरिक्त प्रत्येकी १ किलो रवा, १ किलो चनादाळ, १ किलो साखर व १ किलो लिटर पामतेल या ४ जिन्नसांचा समावेश असलेल्या शिधाजिन्नस संच उपलब्ध करुन देणेबाबत अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक ४ ऑक्टोबर २०२२ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार लातूर तालुक्यात २४८ रास्त भाव दुकाने असून अंत्योदय, प्राधान्य कुटुंब लाभार्थी व एपीएल शेतकरी असे एकुण १ लाख ३३१ लाभार्थ्यांना लाभ मिळणार असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी सदाशिव पडदुने यांचे मार्गदर्शनाखालीव तहसीलदार स्वप्नील पवार यांनी १ किलो रवा, १ किलो चनादाळ, १ किलो साखर व १ किलो लिटर पामतेल या ४ जिन्नसांचा समावेश असलेले संच वितरीत करण्यांत येणार आहे.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड यांना विद्यापीठाची मान्यता प्रदान



**लातूर/प्रतिनिधी**

येथील श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड द्वारा माननीय कुलगुरू यांनी प्रभारी प्राचार्य म्हणून नुकतीच मान्यता प्रदान केली आहे. त्या प्रित्यर्थ त्यांचा यथोचित सत्कार श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. शिवशंकरप्पा बिडवे आणि सचिव मा. मन्मथप्पा लोखंडे यांच्या शुभ हस्ते शाल आणि पुष्पहार देऊन करण्यात आला यावेळी ड. धनंजय मिटकरी, माजी सिनेट सदस्य डॉ. अशोक मोटे, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य बालाजी जाधव आणि स्टाफ सचिव कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा बिडवे म्हणाले की, आपण महाविद्यालयात कार्य करताना सहकार्य व जबाबदारीने कार्य केल्यास महाविद्यालयाचा शैक्षणिक विकासाचा आलेख सतत उंचावत राहील. यासाठी आपण सर्वांनी परिश्रम घेणे गरजेचे असल्याचे सांगून त्यांनी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांना पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे सचिव मन्मथप्पा लोखंडे म्हणाले की, आपल्या मनात जर दुर्दम्य इच्छा शक्ती असेल तर कुठलेही कार्य सकारात्मक पद्धतीने घडून येते याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आपले प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांना विद्यापीठाने दिलेली प्रभारी प्राचार्य पदाची मान्यता होय असे सांगून त्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी अभिनंदनपर मनोगत व्यक्त करताना उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे म्हणाले की, एकीचे बळ तुका म्हणे, हेची फळ या व्यक्तीप्रमाणे महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी एकजुटीने कार्य करावे तेव्हाच आपल्याला खऱ्या अर्थाने शैक्षणिक विकास साध्य करता येईल असे ते म्हणाले. यावेळी सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड म्हणाले की, आपली भूमिका जर सत्यवादी असेल तर त्यावर आपण निष्ठेने ठाम राहून कार्य केल्यास त्याची यशस्वीता आपल्याला नक्की मिळते असे सांगून श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष आणि सर्व सन्माननीय पदाधिकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे त्यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅप्टन प्रा. डॉ. बी. एम. गोडबोले यांनी केले तर आभार उपप्राचार्य संजय पवार यांनी मानले. या कार्यक्रमाला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व समन्वयक, विभाग प्रमुख, पर्यवेक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उदगीर ग्रामीण हद्दीतील उसाच्या शेतातील गांजा लागवडीवर कार्यवाही; १० लाख १ हजार ६१९ रुपयांचा मुद्देमाल जप्त



**उडगीर/करकरे अंबादास**

पोलीस अधीक्षक निखील पिंगळे यांनी लातूर जिल्ह्यातील घडलेले गुन्हे, अवैध धंदे विरुद्ध कारवाई करण्यासाठी वेळोवेळी आदेशित केले होते. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन स्तरावर अवैध धंद्यावर कार्यवाही करण्यात येत होती. दरम्यान उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे मौजे डोंग्रज येथे आज दिनांक ११/१०/२०२२ रोजी उदगीर ग्रामीण पोलिसांच्या पथकाला गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, मौजे डोंग्रज शिवारात इसम नामे दशरथ रामचंद्र कांबळे याने त्याचे मालकीचे ऊसाचे शेतीमध्ये बेकायदेशीररित्या गांजाची झाडाची लागवड केली आहे.अशी खात्रीशीर माहिती मिळाली.

पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक अनुराग जैन,उपविभागीय पोलीस अधिकारी, उदगीर डॅनियल बेन यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक दीपक कुमार वाघमारे यांचे नेतृत्वात पोलिस ठाणे उदगीर ग्रामीण येथील अधिकारी व अंमलदार यांनी सदर घटनेच्या ठिकाणी मौजे डोंग्रज येथील इसम दशरथ रामचंद्र कांबळे याचे ऊसाचे शेतामध्ये जाऊन छापा मारला. त्याचे उसाच्या शेतीमध्ये बेकायदेशीररित्या गांजाची ४४ झाडे लावलेली मिळून आली. सदर गांजाचे झाडांची घटनास्थळीच दोन शासकीय पंचांसमक्ष पंचनामा करून वजन केले असता त्याचे वजन १०९ किलो अंदाजे किंमत १० लाख ०१ हजार ६१९ रुपये इतकी असून सदरचा मुद्देमाल हा ताब्यात घेतला आहे. यातील आरोपी दशरथ रामचंद्र कांबळे, वय ४७ वर्ष, राहणार डोंग्रज तालुका चाकूर यास ताब्यात घेतले आहे. पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक क ६४६/२०२२ कलम ०८,२०,२२ गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. गुन्हचा पुढील तपास पोलीस ठाणे उदगीर ग्रामीणचे पोलीस उपनिरीक्षक सुमेध बनसोडे हे करीत आहेत. सदरची कार्यवाही वरिष्ठांचे व उपविभागीय पोलीस अधिकारी,उदगीर शडॅनियल बेन यांचे मार्गदर्शनात उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपककुमार वाघमारे, पोलीस उपनिरीक्षक सुमेध बनसोडे, तानाजी चेरले, पोलीस अमलदार रमेश कांबळे, राम बनसोडे, सखाराम भिसे, सिद्धेश्वर स्वामी, कृष्णा पवार, तुळशीराम बरुरे, राहुल गायकवाड, नामदेव चेरले, शिवदास बोईनवाड, गंगाधर साखरे, नजीर शेख यांनी केली आहे.

## अवैध होर्डिंग व बॅनरवर लातूर पालिका व पोलिसांची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी**

मा.उच्च न्यायालयाने अवैध होर्डिंग लावण्या संदर्भात मनाई केली असतानाही काही इसमाकडून मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन न करता शहरात ठिकठिकाणी सर्रास अवैध होर्डिंग, बॅनर व पोस्टर लावले जात असल्याचे निदर्शनास आल्याने पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांचे आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांचे मार्गदर्शनात लातूर शहरातील पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच लातूर महानगरपालिकेचे क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमानाने गेली ०२ दिवसापासून विशेष राबवून विविध विषयांचे विनापरवाना,अवैधरीत्या बॅनर, होर्डिंग लावून शहराच्या सार्वजनिक विद्रूपीकरणास कारणीभूत ठरलेल्या व अवैधरित्या होर्डिंग बॅनर लावणाऱ्यावर लातूर शहरातील पोलीस ठाणे एमआयडीसी, शिवाजीनगर व विवेकानंद चौक येथे महाराष्ट्र सार्वजनिक संपत्ती विद्रूपिकरण कायदा १९९५ अन्वये एकूण सात गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. महापालिकेच्या झोनच्या पथकाने अवैध होर्डिंग जप्त केल्यानतंर संबंधितावर दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अवैध होर्डिंग, बॅनर हटविण्याची कारवाई यापुढेही नियमित सुरु राहणार असून रात्रीच्या सुमारास होर्डिंग लावले जाते. अवैध होर्डिंग व पोस्टर जप्त करून अवैध होर्डिंग लावण्याचे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. दोषींच्या विरोधात कारवाई करण्यात येणार आहे.

## हन्नूर येथील अनंत चैतन्य प्रशालेत वाचन प्रेरणा दिन व जागतिक हात धुवा दिन साजरा



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला,हन्नूर येथे आज शनिवार दिनांक १५ ऑक्टोबर रोजी भारताचे अकरावे राष्ट्रपती, मिसाईल मॅन म्हणून सर्वश्रुत असलेले भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या ९१व्या जयंती निमित्त व डॉ. कलाम यांना वाचनाची, लेखनाची खूप आवड होती. त्यांच्या या छंदाचा विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन वाचन छंद जोपासावा, त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण व्हावी या उदात्त हेतूने भारत सरकारने डॉ. कलाम यांचा जन्म दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतल्याने साजरा करण्यात आले तर आज जागतिक हात धुवा दिन असल्याने हात धुवा दिन साजरा करण्यात आले. प्रारंभी प्रशालेचे सन्माननिय मुख्याध्यापक विलास बिराजदार यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच प्रशालेचे पर्यवेक्षक अशोक साखरे यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकाने मस्तक सुधारते व सुधारलेले मस्तक कुणा पुढेही नतमस्तक होत नाही, वाचाल तरच वाचाल असे सांगून मोबाईल, दूरदर्शन मुळे वाचन छंदाकडे होत असलेले दुर्लक्ष लक्षात आणून देऊन वाचनाचे महत्त्व पटवून दिले .व निरोगी आरोग्याकरिता हात धुण्याचे व स्वच्छतेचे महत्त्व सांगितले व कोरोना काळात आलेल्या अनुभवाची आठवण करून दिली. तर कलाशिक्षक राजेंद्र यंदे यांनी हात धुण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. याप्रसंगी हन्नूर आरोग्य उपकेंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. वैजनाथ बिराजदार यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य स्वच्छतेविषयी घ्यावयाची काळजी याविषयी माहिती सांगितली. यावेळी आरोग्य सेविका सुंगधी, आरोग्य सेवक विजय कोरे, प्रशालेचे जेष्ठ शिक्षक ज्ञानदेव शिंदे, सरदार मत्तेखाने, निंगप्पा बिराजदार, प्रा. रमेश शिंदे प्रा. रवींद्र कालीबत्ते सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक व सुत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे यांनी केले तर आभार स्वप्नाली जमदाडे यांनी मानले.

## अवैध विदेशी दारूची तस्करी करणाऱ्यास साडेआठ लाखांच्या मुद्देमालासह एकाला अटक



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडीत गुन्हे शाखा व राज्य उत्पादन शुल्क विभाग यांनी केलेल्या संयुक्त कारवाईत विदेशी दारूची तस्करी करणाऱ्या एकास कार व मुद्देमालासह ताब्यात घेत अटक केली आहे.पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहिती नुसार भिवंडी गुन्हर शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांना कल्याण भिवंडी मार्गावरून विदेशी मद्याची तस्करी केली जात असल्याची खात्रीशीर माहिती बातमीदारा मार्फत मिळाली. त्यानुसार वरिष्ठ पो निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे सपोनिरी धनराज केदार, विजय मोरे, प्रफुल्ल जाधव, पोउपनिरी रमेश शिंगे, सपोउनिरी रामचंद्र जाधव, पोलीस कर्मचारी मंगेश शिर्के, सविन जाधव, सचिन सोनवणे, नरसिंह क्षीरसागर, भावेश घरत, अजितसिंग राजपुत, श्रेया खताळ, रविंद्र साळुंखे व राज्य उत्पादन शुल्क विभाग, भिवंडी यांचे संयुक्त पथकाने सापळा रचून रांजणोली नाका, भिवंडी बायपास सार्वजनिक रोडवर सिल्हर रंगाची संशयित कार क्रमांक चक-०४-एद-६२२५ आल्या नंतर पोलिसांनी कार थांबवत कार ची झडती घेतली असता त्यामध्ये मॅकडॉल या विदेशी ब्रँड च्या ११५२ बाटल्या २४ बॉक्स मध्ये आढळून आल्या. कार चालक संजय ज्ञानेश्वर कोळेकर रा.ऐरोली, नवी मुंबई यास ताब्यात घेत त्या विरोधात कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून चौकशी केली.त्यामध्ये हा विदेशी मद्य साठा सुनिल उर्फ बाबु याचा असल्याचे सांगितले.तसेच त्याने आणखी विक्री करीता साठवणुक केलेला मॅकडॉल या ब्रँड च्या विदेशी दारूचे १३० बॉक्स मधील ६२४० बाटल्या मानपाडा पोलीस ठाणे हद्दीतील हेदुटणे येथुन जप्त करण्यात आलेले आहेत. या एकूण कारवाईत ४७३,०८८ रुपये किमतीच्या ७३९२ बाटल्या विदेशी मद्य व कार मोबाईल रोख रक्कम असा एकूण ८ लाख ८८ हजार ८८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास भिवंडी गुन्हे शाखेचे पोउपनिरी रमेश शिंगे हे करीत आहेत.



## वीज कोसळल्याने दोन महिलांचा मृत्यू तर एक गंभीर

**भिवंडी/अभिजित हिरे**

परतीच्या पावसाने महाराष्ट्रात धुमाकूळ घातला असताना भिवंडी तालुक्यात पिसे ग्रामपंचायत हद्दीतील चिराडपाडा या आदिवासी वस्ती असलेल्या ठिकाणी वीज कोसळून झालेल्या दुर्घटनेत दोघा युवतींचा जागे वरच दुर्दैवी मृत्यु झाला तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे. शीतल अंकुश वाघे वय १७,योगिता दिनेश वाघे अशी मृत युवतींची नावे असून सुगंधा अंकुश वाघे वय ४० या गंभीर जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. चिराडपाडा या आदिवासी पाड्यावर राहणाऱ्या शीतल अंकुश वाघे, योगिता दिनेश वाघे व सुगंधा अंकुश वाघे या सायंकाळी पाऊस नसल्याने जंगलात भाजीसाठी खेकडे पकडण्यासाठी गेले असता अचानक आकाश काळवंटत ढगांचा गडगडाट व विजांचा कडकडाट करीत पावसाला सुरवात झाली. त्यामध्ये अचानक कडाडलेली वीज कोसळली ती या महिला उभ्या असलेल्या ठिकाणी त्यामध्ये या तिघी ही गंभीर जखमी होऊन पडल्या. सुमारे एक तासाने ही माहिती पाड्यावरील नागरीकांना कळल्या नंतर ग्रामस्थांनी या तिघींना पडघा प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी घेऊन गेले तेथे दोघी जणींना वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषित केले तर एका जखमी महिलेला पुढील उपचारासाठी भिवंडी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.

## राज्य सरकार जनतेला दिवाळीनिमित्त देणार जीवनावस्तूची किट; आमदार डॉ.बालाजी यांनी अधिकाऱ्यांची घेतली भेट



**अंबरनाथ/सुनील तांबे**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली, अंबरनाथ विधानसभा मतदार संघांचे आमदार ड्रॉ. बालाजी किणीकर यांनी जीवनावस्तूची किट प्रत्येक गरीब गरजू राशनकार्ड धारकांना मिळायला हवी त्या साठी घेतली बैठक. नेहमीच चर्चेत असणारे, गरीब गरजू जनतेच्या मदतीसाठी तत्पर धावून येणारे अंबरनाथ विधानसभा आमदार डॉ. बालाजी किणीकर यांनी राज्य सरकार कडून दिवाळी निमित्त गरीब गरजू जनतेला राशनकार्ड वर्ती मिळणाऱ्या जीवनावशक वस्तू, १ किलो गोळे तेल, १ किलो रवा, १ किलो चणा डाळ, १ किलो साखर अशी किट राज्य सरकारने देण्याचे जाहीर केले असून ते गरजू राशनकार्ड धारकांना मिळावी म्हणून,अंबरनाथ विधानसभा मतदार संघचे आमदार यांनी उल्हासनगर ५ राशन कार्यालय येते शिधा वाटप दुकान मालक व राशन कार्यालय अधिकारी यांची बैठक घेऊन, दुकानदार व अधिकारी यांना आपापले कार्य चोक पार पडावे. ज्या कोणाचा थंब नसेल येत तर त्यांचे आधारकार्ड आणि मोबाईल नंबर घेऊन त्यांना सुद्धा किट देण्यात यावी. जर याच्या मध्ये गैर प्रकार आढळल्यास दुकान मालक आणि अधिकारी यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई केल्या जाईल. असे शिधावाटप दुकान मालक व अधिकारी यांना निर्देश देण्यात आले. या अनुषंगाने परशुराम पाटील, सुशील पवार, युवराज पाटील, राजू वाळंज व पदाधिकारी आणि असंख्य कार्यकर्ते सुद्धा उपस्थित होते.

## मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटक्यावर जोरदार कारवाई

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीत भंडारकवठे व टाकळी येथे प्रत्येकी मटका घेताना मंद्रूप पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईमुळे मटका घेणाऱ्यामध्ये मोठी खळबळ उडाली आहे. मंद्रूप येथे देविदास झायप्पा कांबळे (४८) यास मटका घेताना पोलिसांनी पकडले. त्याच्या जवळील ४३० रुपये पोलिसांनी जप्त केले याची फिर्याद पोलीस कर्मचारी कृष्णा पवार यांनी दिली आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक शहाजी कांबळे हे करीत आहेत. भंडारकवठे येथे बालाजी लक्ष्मण बंदीछोडे (२५) यांच्याकडून ७५० रुपये जप्त केले आहेत. याची फिर्याद पोलीस कर्मचारी किरण चव्हाण यांनी दिली आहे, तपास पोलीस उपनिरीक्षक अशोक ढवळे हे करीत आहेत. टाकळी येथे सतीश सिद्धप्पा पुजारी (२३) यास मटका घेत असताना पोलिसांनी पकडले त्याच्या जवळील ११८० रुपये जप्त केले आहेत. याची फिर्याद पोलीस कर्मचारी माजिद शेख यांनी दिली असून तपास हवालदार प्रमोद आसादे हे करीत आहेत. या तिन्ही आरोपींना ताब्यात घेऊन नोटीस देऊन सोडण्यात आले ही सदरची कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांच्या पथकाने केली आहे.

# शेतकऱ्यांच्या हक्काचे खत चोरीच्या मार्गाने गोदामात

## १७ लाखांचा निमकोटेड युरियाचा साठा जप्त; नारपोली पोलिसांची कारवाई



**भिवंडी/प्रतिनिधी**

शेतकऱ्यांसाठी अनुदान किमतीत शासन खत उपलब्ध करून देत असताना माफियां कडून शेतकऱ्यांच्या खतावर डल्ला मारून तो खत साठा व्यापारी उपयोगासाठी वापरात आणून बक्कळ नफा कमावणाऱ्या माफियावर नारपोली पोलीसांनी कारवाई करीत १७ लाख रुपयांचा निमकोटेड युरियाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहिती नुसार पुर्णा येथील महालक्ष्मी वेअर हाउसच्या गोदामा मध्ये निमकोटेड युरियाचे साठवणुक करून शासनाची व शेतकऱ्याची फसवणुक केली जात आहे अशी माहिती नारपोली पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक मदन बल्लाळ यांना मिळाली.त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक चेतन पाटील, ब्रिजेश शिंदे, कळवा पोलीस ठाणे येथील सपोनि निलेश कानडे व पथकाने गोदामावर छापा टाकला. ज्यामध्ये गोदाम मालक प्रफुल्ल चंद्रकांत देशमुख, रा.नवी मुबंई यांच्या ताब्यात असलेल्या गोडावुन येथे साठवलेला व तेथे उभ्या असलेल्या ट्रक क्रमांक KA -56 -5472 अशा ठिकाणाहून प्रत्येकी ५० किलो वजनाच्या १७८६ गोणी निमकोटेड व संशयित साठवणुक केलेल्या युरियाचा १६ लाख ९६ हजार ७०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. नारपोली पोलिसांनी जप्त केलेल्या निमकोटेड युरिया खताचे नमुने ठाणे कृषी विभाग यांच्या मदतीने नाशिक येथील खत चाचणी प्रयोगशाळा येथे तपासणी साठी पाठविले.तेथील अहवाल नुसार सदरचा युरिया हा शेतीसाठी खत म्हणून उपयोगात येणारा असल्याचे स्पष्ट झाल्याने ठाणे कृषी विभागातील जिल्हा गुणवत्ता नियंत्रक विजय तुपसौदर्य यांनी दिलेल्या तक्रारी वरून योग फारमा कंपनी व इतर संशयितांच्या विरोधात नारपोली पोलीस ठाणे येथे फसवणुकीसह खत नियंत्रण व अत्यावश्यक वस्तु अधिनियमा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक चेतन पाटील हे करीत आहेत. शेतकऱ्यांच्या शेतीसाठी दिलेला खत साठा काळ्या बाजारात निमकोटेड युरियाची साठवणुक अत्यंत बेमालूमपणे पुर्णा येथील आडवळणाच्या जागेत असलेल्या गोदामात सुरू होती. त्यामुळे पोलिसांच्या अथवा कोणाच्या नजरेस हा काळ्या बाजारातील खत साठा लक्षात येत नव्हता. पोलीसांनी ...पान ६ वर

# महिलांच्या आरोग्यासाठी उल्लेखनिय सेवेबद्दल राज्यपालांच्या हस्ते डॉ.कल्यान बरमदेंचा सन्मान



**लातूर/प्रतिनिधी**

प्रसूती आणि स्त्रीरोग तज्ज्ञांच्या संघटनेच्या वतीने मुंबईच्या राजभवनावर नुकत्याच पार पडलेल्या एका शानदार समारंभात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते लातूर येथील प्रख्यात स्त्री रोग व वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. कल्यान बरमदे यांचा महिलांच्या आरोग्यासाठी उल्लेखनिय सेवेबद्दल स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. महिला आरोग्याच्या क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या राज्यातील निवडक प्रसूतीतज्ञ व स्त्री रोग तज्ज्ञ डॉक्टरांचा राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते राजभवनावर सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्रसूती आणि स्त्रीरोग तज्ज्ञ संघटनेच्या वर्ष २०२० - २२ च्या अध्यक्षा डॉ. नंदिता पालशेतकर, वर्ष २०२२ - २४ चे नवनियुक्त अध्यक्ष डॉ. राजेंद्रसिंह परदेशी यांची प्रमुख उपस्थिती होती. या सन्मान सोहळ्यात डॉ. कल्याण बरमदेंसह एकूण ३७ तज्ज्ञ डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. स्त्री रोग व वंध्यत्व निवारण क्षेत्रात डॉ. कल्याण बरमदे यांचे कार्य अत्यंत उल्लेखनिय असे राहिले आहे. आजपर्यंत हजारो निःसंतान दांपत्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचे काम डॉ. बरमदे यांनी केले आहे. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा ...पान ६ वर

# श्रमजीवी संघटनेचे सत्याग्रह आंदोलन




**वाडा/प्रतिनिधी**

रेशनिंगच्या धान्यापासून वंचित असलेल्या आदिवासी कुटुंबियांना रेशन दुकानातून धान्य मिळावे यासाठी श्रमजीवी संघटनेच्या वतीने शुक्रवारी सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. वाड्यातील खंडेश्वरी नाका ते तहसील कार्यालया पर्यंत श्रमजीव संघटनेच्या वतीने मोर्चा काढण्यात आला. प्राधान्य व अंत्योदय योजनेच्या लाभापासून वंचित असणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना तात्काळ अन्न धान्य देण्याची व्यवस्था करावी, अंत्योदय व प्राधान्याच्या इष्टांक अभावी वंचित असणाऱ्या गरीबांना अन्न धान्य मिळावे यासाठी इष्टांकामध्ये तात्काळ वाढ करण्यात यावी, ऑनलाईन न झालेल्या शिधापत्रिका तात्काळ ऑनलाईन करण्याचा कालबद्ध कार्यक्रम हाती घ्यावा, दिवाळी गोड करण्याच्या उद्देशाने शासनाच्या शंभर रूपयात धान्यकिट देण्याच्या (साखर, रवा, चना डाळ आणि पामतेल) निर्णयाचा लाभ प्रत्येक शिधापत्रिकाधारकाला मिळावा. ज्यांच्याकडे शिधापत्रिका आहेत. परंतु धान्य मिळत नाही त्यांना देखील लाभ मिळावा अशा विविध मागण्याबसाठी महिलांनी सत्याग्रह मोर्चा काढून ...पान ६ वर

# कोळी समाजाच्या जात पडताळणीसाठी लातूर जिल्ह्यात विशेष शिबीराचे आयोजन करू -संभाजीराव पाटील-निलंगेकर



**निलंगा/प्रतिनिधी**

सध्या राज्यात शिंदे-फडणविस हे भाजपा युतीचे सरकार असून हे सरकार प्रत्येक समाजातील घटकाला न्याय देण्यासाठी कटिबद्ध आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'कोळी महादेव' समाजाला जातीचे दाखले मिळतात मात्र त्याची जात पडताळणीसाठी अडचणी येतात त्या दूर करून सुलभ पध्दतीने जात पडताळणीसाठी लातूर जिल्ह्यात विशेष शिबीराचे आयोजन करणार असल्याची ग्वाही माजी मंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर यानी बुधवारी ता. १२ रोजी दिली. चिचोंली भंगार ता. निलंगा येथे अद्य कवि महर्षी वाल्मिकी मुर्ती स्थापना कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर औसाचे आमदार अभिमन्यू पवार, महर्षो वाल्मिकी मुर्ती अर्पण करणारे शेतकरी नागनाथ मुडे व त्यांच्या पत्नी करूणा मुडे, सतिश धडे, चंद्रहास नलमले,सरपंच सुशलाबाई हत्ते,संजय बोयणे, शेषराव ममाळे, विरभर्द स्वामी, ज्ञानेश्र्वर वाकडे, बळी पाटी आदी उपस्थित होते. पुढे बोलताना निलंगेकर म्हणाले की, येणाऱ्या काळात कोळी समाजाच्या वैद्यतेची जबाबदारी माझी असून या समाजावर गेल्या अनेक वर्षापासून जात पडताळीसाठी अन्याय होत आहे. यासाठी आपण लवकरच आम्ही अदिवासी मंत्र्याची भेट घेऊन चर्चा करणार आहोत. लातूर जिल्ह्यातील कोळी समाजाच्या जात पडताळणीसाठी विशेष शिबीर घेऊन हा प्रश्र्न कायमचा मार्गी लावण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे मी व आमदार अभिमन्यू पवार प्रयत्न करणार आहोत. जातीच्या प्रमाणपत्रासाठी जिल्ह्यात कोणत्याही अधिकाऱ्यांनी अडवणूक केल्यास त्याची गय केली जाणार नाही अशा सुचनाही निलंगेकर दिल्या. लातूर जिल्ह्याचा पालकमंत्री कोण होईल यापेक्षा भाजपचा पालकमंत्री झाल्याचा आनंद आहे असे सांगून पूर्वी जिल्ह्याचे राजकीय केंद्र हे लातूर होते. आता राजकीय केंद्र निलंगा आहे. वाडप्या आपला असल्यामुळे विकास निधी कमी पडणार नाही अशी ग्वाही देऊन महाविकास ...पान ६ वर


# शाळा बंदचा निर्णय रद्द करा; देवणी महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक महासंघाची तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन



**देवणी/प्रतिनिधी**

राज्य शासनाने जिल्हा परिषद शाळेतील २० पटसंख्येखालील शाळा बंद करण्याचा घेतलेला निर्णय रद्द करावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक महासंघ देवणी च्या वतीने शुक्रवार दि.१४ ऑक्टोबर रोजी देवणी तहसीलदार सुरेश घोळवे यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. शिक्षण विभागाच्या वतीने राज्यतील जिल्हा परिषदेच्या ० ते २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या सर्व शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार हालचाली सुरू केल्या आहेत. या निर्णयामुळे तांडा वस्ती व वाड्यावरील गोरगरिबांच्या विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी शिक्षण विभागाने सदरील निर्णय थांबवावे अशी विनंती राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनावर महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक महासंघ देवणी तालुका अध्यक्ष विनोद कांबळे सर सरचिटणीस देविदास तेजेवाड, कांतराव कांबळे, भरत पुंड, विजयकुमार पाटील, चंद्रकांत मोठेराव, एस.व्ही. टिळे, चंद्रकांत गरड, अझीझ तांबोली, वाय एम बालुरे, एस डी. चांदेश्वरे यांच्यासह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# माता पिता हेच आपले दैवत आचार्य गुरुराज स्वामी यांचे प्रतिपादन



**अहमदपूर/प्रतिनिधी**

खरं म्हणजे देव हा प्रत्येक घरी परिवारात येऊ शकत नाही. त्यामुळे जन्मदाता म्हणजेच माता पिता हे आपल्या घरात देवा समान असतात म्हणून भारतीय संस्कृतीत घराघरात मातापित्यांना अत्यंत सन्मानाची व आदराची वागणूक द्या असे आग्रही प्रतिपादन भक्ती स्थळाचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी यांनी केले.ते गौरीशंकर मंदिरात कैलासवासी प्रभाकर पुणे यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त दिव्य शिव कथेच्या समारोपाच्या आशीर्वाचन प्रसंगी बोलताना व्यक्त केले. यावेळी कथा व्यासपीठावर शि भ प शिवकथाकार बाबुराव सोनटक्के महाराज करंजीकर, माजी मंत्री बाळासाहेब जाधव, माजी नगराध्यक्ष अश्र्विनी कासनाळे, माजी सभापती आयोध्याताई केंद्रे, बाजार समितीचे सभापती शिवानंद हेंगणे, माजी सभापती निळकंठ होनराव पाटील, बाजार समितीचे संचालक अनिल मेनकुदळे, संचालक सुंदरराव साखरे, माजी नगरसेवक सर्वश्री लक्ष्मीकांत कासनाळे, अभय मिरकले, संदीप चौधरी, एडवोकेट निखिल कासनाळे, आडत व्यापारी दत्तात्रय दराडे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना आचार्य गुरुराज स्वामी म्हणाले की, माणूस जन्माने मोठा होत नसून तो त्याच्या कार्यामुळे मोठा होतो. भक्तीचा खरा आरंभ श्रोत्याच्या श्रवणात असल्याचे सांगून सर्व कथांच्या मध्ये शिवकथा ...पान ६ वर

# वसई न्यायालयात १२ नोव्हेंबरला लोकन्यायालयाचे आयोजन

**वसई/प्रतिनिधी**



समंजस आणि तडजोडीने जीवन सुखी बनवूया चला आपण लोकन्यायालयाचा मार्गाने जाऊया या बोधवाक्यांनी वसई न्यायालयात १२ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय लोक न्यायालयांमध्ये दिवाणी स्वरूपाची तडजोडीस पात्र फौजदारी स्वरूपाची विवाहित स्वरूपाची १३८ बँक वसुली प्रकरणे मोटर अपघात नुकसान भरकाई प्रकरणे कौटुंबिक वादप्रकरणी भूसंपादन प्रकरणे वीज व पाणी विषयक द्यावयास प्रकरणे महसूल प्रकरणे तसेच दाखल पूर्व प्रकरणे इत्यादी तडजोडी साठी ठेवण्यात येणार आहे. तरी सर्व पक्षकारांनी अहवालक करण्यात येते आहे की त्यांनी सदर संधीचा फायदा घ्यावा व आपल्या जास्तीत जास्त प्रकरणे लोकन्यायालयात ठेवण्यासाठी या न्यायालयात प्रलंबित असतील त्या न्यायालयात अर्ज करावा तसे दाखला पूर्ण प्रकरणाबाबत तालुका विधी सेवा समिती वसई यांच्याकडे संपर्क साधून अर्ज करावे. सर्व पक्षकारांनी प्रलंबित प्रकरणे समंजसने सोडवण्याकरिता व आपले दुरावलेले संबंध पुन्हा स्थापित करण्यासाठी राष्ट्रीय लोक अदालतीचा अवश्य लाभ घ्यावा असे आव्हान जिल्हा सत्र न्यायालय न्यायाधीश डॉक्टर सुधीर देशपांडे तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती यांनी केला आहे.

# राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून पोलिस आयुक्तालयात साजरा



**मीरा-भाईंदर/प्रतिनिधी**

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय मीरा रोड येथील सभागृहात भारताचे माजी राष्ट्रपती स्वर्गीय डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने १५ ऑक्टेंबर हा त्यांच्या जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येत असतो. वाचन संस्कृती वाढीस लावावी तसेच मराठी भाषेचा प्रचार प्रसार या उद्दिष्टांसह रोजगारभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी व वाचन संस्कृती जोपासण्यासाठी प्रोत्साहन मिळावे याकरिता विविध कार्यक्रम आयोजित करण्यात बाबत शासनाचा निर्देश होता. सदर उपक्रमाच्या अनुषंगाने मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्त कार्यालयामधील संवाद हॉल येथे आज दिनांक १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या वेळी कार्यालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सहभाग नोंदवून कार्यक्रमाच्या सर्व सर्वांनी राष्ट्रभक्ती विज्ञान तंत्रज्ञान इत्यादी विषयावर पुस्तकाचे वाचन केले. कार्यक्रमाच्या वेळी पोलीस उपयुक्त विजयकांत सागर, सह पोलीस आयुक्त विनायक नरळे तसेच पोलीस अधिकारी अमलदार व महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांचा उपस्थित होते.

# पाथरी येथील आरोग्य शिबिरचा १५१ विद्यार्थ्यांनी घेतला लाभ



**पाथरी/प्रतिनिधी**

तालुक्यातील पोहेटककळी येथिल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यात शाळेतील एकुण १५१ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोहेटाकळी येथिल शाळेत पत्रकार लक्ष्मण उजगरे यांनी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन ग्रामपंचायतचे सरपंच शामराव गोंगे यांनी केले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मुरलीधर गोंगे होते तर प्रमुख अतिथी म्हणून गणेश बागल उपसरपंच, आझमखान पठाण ग्रामसेवक, शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष कल्यान गोंगे, अशोक उजगरे, तंटामुक्ती अध्यक्ष आबासाहेब गोंगे आदींची उपस्थिती होते. यावेळी आरोग्य तपासणी शिबिरात वैद्यकीय अधिकारी डॉ ईक्कर, अधिपरीचारीका द्रोपदी ढगे, औषध निर्माण अधिकारी आशेफ सिद्दीकी व आरोग्य सेविका खरवडे आदींनी तपासनी केली. यामध्ये शाळेतील १५१ विद्यार्थ्यांची तपासनी करण्यात आली. तर २१ विद्यार्थ्यांची कीरकोळ उपचार करण्यात आली. त्याच बरोबर ११ विद्यार्थ्यांना पुढील तपासण्या व उपचारासाठी जिल्हा रुग्णालय परभणी येथे पाठवण्यात येणार असल्याची माहीती वैद्यकीय अधिकारी डॉ ईक्कर यांनी दीली आहे. तर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक अजित खारकर यांनी केले तर सुत्रसंचलन रतन कदम यांनी केले तर या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक डांबे सर,मिशे सर,शिंदे सर, गोरे सर व शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य यांनी परीश्रम घेतले.

# देवणी पत्रकार भवनच्या भूमिपूजनाचा पाडव्या दिवशी भूमिपूजन करणार; मल्लिकार्जुन मानकरी यांची पत्रकार परषदेत जाहीर घोषणा

**देवणी/शकील मनियार**



देवणी नगरपंचायतीच्या वतीने शहरात गेल्या सहा महिन्यात केलेल्या विकास कामाची माहिती बुधवार दि.१२ ऑक्टोबर रोजी नगराध्यक्षा डॉ.किर्ती घोरपडे यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेसचे जेष्ठ नेते मलिकार्जून मानकरी यांनी पत्रकार परिषद घेतली होती. देवणी नगरपंचायत निवडणूकनंतर गेल्या सहा महिन्यात शहरातील विविध भागात केलेल्या विकास कामे संदर्भात सखोल अशी माहिती काँग्रेसचे जेष्ठ नेते मलिकार्जून मानकरी यांनी यावेळी बोलताना दिली. तर विविध विषयांवर तसेच पत्रकार भवन च्या संदर्भात जवळपास दहा वर्षापूर्वी देवणी ग्राम पंचातीमध्ये काँग्रेस सी सत्ता असताना देवीदास पतंगे सरपंच होते व तसेच पत्रकार दिनाचे औचित्य साधून वलांडी येथे पत्रकार दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला होता, त्या कार्यक्रमाला तालुक्यातील विविध क्षत्रांमधील मान्यवरांनी हजेरी लावली होती. त्यावेळी तालुक्यातील पत्रकाराणी पत्रकार भवन साठी ग्राम पंचायती मार्फत जागा मागितली व मल्लिकार्जुन मानकरी जागा देण्याचे आश्वासन दिले होते, परंतु या गोष्टीला जवळपास दहा वर्षाचा कालावधी लोटला परंतु परवाच्या पत्रकार परषदेत पत्रकारांनी मागील काळात पत्रकार भवन साठी दिलेल्या शब्दाची पुन्हा एकदा आठवण करून दिली आसता मल्लिकार्जुन मानकरी यांनी पाडव्याच्या शुभ मुहर्तावर पत्रकार भवन चे भूमिपूजन करू असा शब्द दिले असल्याने पत्रकारात उत्सवाचे वातावरण दिसत आहे, परंतु नक्की भूमिपूजन होणार का ? हे मात्र पाडव्या दिवशी कळेल हे मात्र नक्की, यावेळी नगराध्यक्षा डॉ किर्ती घोरपडे, नगरसेवक अनिल इंगोले आणि जेष्ठ नेते मलिकार्जून मानकरी, उपनगराध्यक्ष अमित मानकरी, वैजनाथ लुल्ले, डॉ. संजय घोरपडे, नगरसेवक नदिम मिर्झा, जाफर मोमीन, इस्माईल शेख, राजकुमार बंडगर, अमरदीप बोरे, जावेद तांबोळी, बाबुराव लांडगे यांच्यासह आदी पत्रकार परिषदेत उपस्थित होते.